# पवित्र आत्मा काय आहे?

...महत्प्रयासाने ह्या सभेकरिता. ही सभा जराशी वेगळी आहे ज्या सर्व सामान्यत: होतात. बहुदा प्रत्येक वेळी जेव्हा आपण येथे एकत्र होतो, ही सभा असते... आजाऱ्यांना आरोग्य मिळण्याकरिता आणि शारीरिक गरजांकरिता. त्यावर भर दिला जातो. परंतु आज रात्री आपण ह्या संजीवनाला सुरुवात केली आहे ती जीवाला आरोग्य मिळण्याकरिता, मनुष्याच्या आत्म्याला.

तरीही, जर प्रभूची इच्छा असेल, रविवारी सकाळी, संडे स्कूलच्या वेळी, रविवारी सकाळी, आपण आजाऱ्यांसाठी प्रार्थना करणार आहोत आणि नेहमीची आरोग्यासाठी प्रार्थना, रविवारी सकाळी, जर प्रभूची इच्छा असेल. आणि ह्या आठवड्याच्या रात्री, आपण प्रामुख्याने जीवासाठी– सार्वकालिक गोष्टी बोलण्यावर भर देणार आहोत.

2 आता, आपणाला ठाऊक आहे की जेव्हा एका—एका शरीराला आरोग्य मिळते, ते आपल्याला आनंदीत करते, कारण आपल्याला ठाऊक आहे की, ते निश्चितपणे दाखवते की आपला परमेश्वर आजाऱ्यांना बरे करितो. परंतु ते आजारी व्यक्ती, जर ते फार वर्षे जगले, पुन्हा आजारी होतात, कदाचित त्याच रोगाने ज्यासाठी ते बरे झाले होते, आणि ते आरोग्य तुमच्यापासून घेत नाही. डॉक्टर न्युमोनियासाठी औषध देतील, आणि कदाचित दोन दिवसानंतर ते न्युमोनियाने मरतील जरी हे घोषित केले होते की ते बरे झाले आहेत. तो पुन्हा होतो. परंतु जेव्हा जीवाला आरोग्य मिळते तर ते तुम्हाला, तुमच्यामध्ये अनंत जीवनासाठी मिळते.

3 आणि मी विश्वास करतो की आपण प्रभू येशू ख्रिस्ताच्या आगमनाच्या अगदी जवळ आहोत, की ते आपल्याला त्या सर्व गोष्टी करण्यासाठी योग्य मार्गदर्शन करते की प्रत्येक जीव राज्याकडे आणावा, आणि लोकांकडे देवाचे राज्य आणावे, की आपल्या जीवाला आरोग्य मिळावे. मी विश्वास करतो की येशूचे शरीर हे मला माहीत असलेल्या सर्व शरीरांपेक्षा आजारी होते. ती, ते—ते शरीर, पृथ्वीवरील ख्रिस्ताचे आत्मिक शरीर, खूप आजारी आहे.

4 आणि आता, आम्ही तुम्हाला खूप वेळ रात्री थांबवण्याचे योजले नाही, कारण पहिल्या रात्री आपल्या प्रिय मित्रांना बसवण्यासाठी आपल्याकडे खोल्या नाहीत. आपण नविन प्रार्थनागृह बांधण्याच्या विचारात आहोत, एक मोठे आराधनालय येथेच ह्या ठिकाणी, किंवा जेथे कुठे प्रभू प्रेरणा देईल; परंतु जोपर्यंत आम्हाला ठाऊक आहे, येथे.

5 आणि आता आम्ही सभा ठरवल्या आहेत, बुधवार ते रविवार. परंतु मग रविवारी, ख्रिसमस सुट्ट्या संपत आहे, परंतु ते...जेव्हा प्रभू आम्हास थांबवण्यास सांगतो, तितका समय असेल. आपल्याला त्याचा काय परिणाम होईल हे ठाऊक नाही. परंतु विश्वास करतो की लोक येथे ह्या आराधनालयात आणि आपल्या सहकारी मंडळ्या (त्यांतील एक उत्तिका येथील होलीनेस आराधनालयात आहे, ज्याचे पाळक भाऊ ग्राहम स्नेलिंग आहेत, आणि न्यू ॲसम्बलीमध्ये जेथे भाऊ—भाऊ जॅक्सन पाळक आहेत, आणि बाहेर हायवे येथे जेथे भाऊ रुडेल पाळक आहेत) आम्ही आणि ते, ह्या आराधनायलाच्या सहकारी मंडळ्या आहोत; आम्ही ते दाखवण्याचा प्रयत्न करीत आहोत...आपली लोक ख्रिस्ताशी अधिक चांगल्या सहभागितेसह. तोच आपला उद्देश आहे. म्हणून मी ह्यावर वाचण्यासाठी आणि शिकविण्याचे, पुढील काही रात्रींसाठी ठरवले आहे...

6 आज रात्री मी ह्या विषयावर बोलू इच्छीतो. *पवित्र आत्मा काय आहे?* आणि उद्या रात्री मी ह्या विषयावर प्रचार करीन. *तो कशाकरिता दिला गेला?* आणि शुक्रवारी रात्री... आणि, टेप करणारे, माझी इच्छा नाही की शुक्रवारी रात्री ध्वनीमुद्रण व्हावे: *मला पवित्र आत्मा कसा प्राप्त होईल?* आणि *मला कसे कळेल जेव्हा मला तो मिळेल?* आणि मग आपण तसे होऊ देऊ, मग पाहू की प्रभू आम्हास काय मार्गदर्शन करील. शनिवार आणि रविवारसाठी. आणि रविवारी सकाळी, एक आरोग्य सभा, आणि दूसरी सुवार्तिकांची सभा रविवारी रात्रीसाठी.

7 आणि आता आमची इच्छा आहे की प्रत्येकाने हे समजावे की...आणि मला ठाऊक आहे की ध्वनिमुद्रण मागील, खोलीत चालू आहे, आणि आम्ही हे सांगू इच्छितो. कारण, ह्या अशा सभांमध्ये, सुवार्तिकांच्या टेपवर, आपल्याकडे वेगवेगळ्या संप्रदायाच्या मंडळ्यांतून लोक येतात ज्यांना त्यांच्या विश्वासाच्या क्षेत्रात शिकवलेले असते, प्रत्येक जण. आणि ते योग्य आहे. माझी कधीही इच्छा नाही की माझ्यावर बंधुजनांमध्ये बेबनाव पसरवण्याचा दोष लावण्यात यावा. आणि बाहेर सभांमध्ये मी केवळ वचनाच्या महान सुवार्तेचे सत्य प्रचार करतो, ज्यावर बंधुजन जे विश्वास करतात ते माझ्या सभा प्रायोजक करतात. परंतु, येथे आराधनालयात, मी—मी त्याच गोष्टीवर बोलू इच्छितो ज्यावर आपण विश्वास ठेवतो. ह्या कारणामुळे, जर तुम्ही—जर तुम्हाला ते समजत नाही, मला तुमच्याकडून एखादे लहान पत्र किंवा चिठ्ठी मिळाल्यास मी खूप आनंदी होईल, ज्याद्वारे तुम्ही मला प्रश्न विचाराल की आपण तसा विश्वास का करतो. आणि मला त्याचे स्पष्टीकरण माझ्या परीने देण्यास आनंद होईल.

8 तुम्हाला माहीत आहे, प्रत्येक मंडळी, जर तुमच्याकडे एखादी शिकवण नसेल, तर तुम्ही एक मंडळी नाहीत. तुमच्याकडे काहीतरी असायला हवे ज्यासाठी तुम्ही उभे आहात, काही तत्वे जी तुम्ही पकडून आहात. आणि ह्याची पर्वा न करता की एखाद्या व्यक्तीचे संलग्नीकरण किंवा संप्रदाय काहीही असो, जर तो व्यक्ती देवाच्या आत्म्याने जन्मला आहे, तर तो माझा भाऊ किंवा बहिण आहे...आम्ही कदाचित इतर गोष्टीत वेगळे असू, जसे पूर्वेपासून पश्चिम, परंतु आपण तरीही बंधुजन आहोत आणि मी दुसरे काही करणार नाही परंतु त्या भावाला ख्रिस्ताच्या जवळ, चांगल्याप्रकारे जाण्यासाठी प्रयत्न करीन. आणि मी विश्वास करतो की कोणीही खरा, प्रामाणिक ख्रिस्ती माझ्यासाठी तेच करील.

9 आता, मी ह्या आराधनालयास सांगितले आहे...आता, आपण ह्यामध्ये प्रवेश केवळ प्रवाहात्मक सभेसाठी नाही करीत. मी ह्यात प्रवेश करु इच्छितो, आणि माझी इच्छा आहे तुम्ही, आणि तुम्हाला सांगितले आहे, प्रत्येक अडचण जी तुमच्यामागे आहे ती जाळून टाका, आणि प्रत्येक पाप नीट करा, कारण आपण ह्यामध्ये आपल्या सर्व गोष्टींसह येतो ज्या आपल्या अंतःकरणात आणि जीवनात आहे. आपण येथे ह्याच उद्देशाने आलो पाहीजे की आपला जीव प्रभूच्या आगमनासाठी तयार केला जावा, आणि दुसऱ्या उद्देशासाठी नाही. आणि जसे मी बोललो आहे आणि म्हणालो, ते कदाचित कधीतरी मी शिकवले असेल किंवा बोललो असेल जे दुसऱ्यांच्या विश्वासाच्या जरासे विरुध्द असेल. मी—मी वाद—वादविवादासाठी आलो नाही, तुम्ही पाहा, मी—मी आलो आहे...आपण येथे प्रभूच्या आगमनासाठी तयार करण्यासाठी आहोत. आणि मला वाटते की हा लहान समुह...

10 माझ्याकडे येथे काही बंधुजन भेटण्यासाठी आले आहे ज्यांना मी ओळखतो, निरनिराळ्या ठिकाणाहून आले आहे, आणि त्यांना पाहून आपण आनंदी आहोत. आणि परंतु काही प्रेक्षकामध्ये तेथे आहेत, तेथे इतर शहराबाहेरचे आहेत, त्यांतील काही सभोवतालच्या शहरांतून आले आहेत. आणि तुम्हाला आमच्यामध्ये पाहून आम्ही

आनंदीत आहोत, आणि तुमचे कौतुक करतो, जर तुम्ही आमच्यावर प्रेम करता की ह्या गोष्टी ऐकण्यासाठी तुम्ही आला आहात. परमेश्वर...तुम्ही तुमच्याबरोबर, माझ्या भावा, बहीणींनो, ह्या देवाचा श्रीमंत खजाना जो तुमच्या अंत:करणात ओतला आहे हा घेऊन जा, ही माझी प्रार्थना आहे.

11 आणि ह्या लहान आराधनालयात, ह्यांना पाहून मला वाटते की हे पृथ्वीवरील सर्वात चांगल्या लोकामधील एक आहेत, जे ह्या आराधनालयात जातात. आता, मी कधीच म्हटले नाही "सर्व" चांगले लोक. मी म्हणालो पृथ्वीवरील काही चांगले लोक ह्या आराधनालयात जातात. परंतु जसे दिवस जात आहेत, प्रवेश करीत आहे, सभापासून सभेपर्यंत, मला एक महान गरज ह्या आराधनालयात वाटत आहे, ह्यामध्ये एक मोठी गरज आहे, ती म्हणजे भरण्याची, किंवा एक समर्पित, खोल जीवन, देवासह जवळून चालणे. आणि मी त्यांना ते करण्याचे अभिवचन दिले आहे, हे संदेश त्यांच्याकरिता देण्याचे. आणि आम्ही आनंदीत आहोत तुम्हाला आत पाहून आणि आमच्याबरोबर देवाच्या वचनाची सहभागिता करावी, जसे आम्ही शिकवतो आणि हे बाहेर आणण्याचा प्रयत्न करतो.

12 आता, पहिल्या तीन रात्री आम्ही प्रचारासाठी कोणताही विषय घेणार नाही, परंतु देवाच्या वचनातून एका संदेशाचे शिक्षण देणार.

आणि आता, मी तुम्हा कोणालाही अशी गोष्ट करण्यास सांगणार नाही जी मी स्वत: करणार नाही. आणि हा आठवडा माझ्यासाठी पूर्णतः कलवरी आहे. मी काळोखाच्या इतक्या जवळ होतो, की—की मी तो ठेवावा, मी जवळजवळ माझ्या बाजूला होतो. परंतु मी पूर्णतः प्रत्येक इच्छा आणि सर्वकाही जे मी जाणतो, प्रभूच्या स्वाधीन केले.

13 त्या रात्री, अंदाजे मध्यरात्रीनंतर, माझी पत्नी आणि मी, उठल्यावर, आणि प्रार्थना करीत आणि प्रभूशी बोलत होतो, लहान पाय टेकण्याच्या स्टूलच्या पलिकडे...आमच्या पुढच्या खोलीत, दोन उघडलेल्या बायबलसहित, आम्ही स्वत:ला नव्याने देवापुढे, संपुर्ण सेवेसाठी समर्पित केले, की आम्ही आमच्या इच्छा, आणि सर्वगोष्टी, आणि प्रत्येक नकारात्मक विचार स्वाधीन करावा, आणि प्रभू येशूची सेवा करावी.

आणि मी विश्वास करतो की तोच तुमचाही दृष्टीकोन असावा, की तुम्हीही तीच गोष्ट केली असेल. तर जेव्हा ह्या रात्री आपण येत आहोत, आम्ही ह्या पवित्र भूमीवर येत आहोत, ह्या लोकांमध्ये जे प्रार्थना करीत आहेत, आणि उपास करीत आहेत, आणि भरपाई करीत आहेत, आणि देवाकडून काहीतरी घेण्यासाठी तयार होत आहेत. आणि मला ठाऊक आहे जो भूकेला होऊन येतो तो भूकेला परत जाणार नाही, परंतु देव जीवनाची भाकरी त्याला खाऊ घालील.

14 आता, आम्ही त्याच्या पवित्र पुस्तकांतून वाचण्याआधी, काही क्षणांसाठी आपली मस्तके प्रार्थनेसाठी झुकवूया.

15 प्रभू, तेथे अगोदरच ह्या जागी ह्या रात्री प्रार्थना केलेली आहे. तेथे...सीयोनेचे गीत तुझ्या लेकरांनी गायलेले आहे. त्यांची अंतःकरणे उंच केली आहेत. आणि आम्ही स्वत:ला तुला समर्पित करण्यासाठी येथे आलो आहोत, आणि आमच्या जीवाच्या आतून तुझी आराधना करण्यास आलो आहोत. आणि आम्ही तुझ्या स्मरणार्थ बोलावीत आहो, प्रभू, तू म्हटलेस जेव्हा तू डोंगरावर बसला होता आणि तुझ्या शिष्यांना शिकवत होता, "नीतीमत्वासाठी जे भूकेलेले आणि तहानलेले ते धन्यवादीत आहेत, कारण ते तृप्त केले जातील." प्रभू, तू त्याचे अभिवचन दिले आहे. आम्ही खुल्या अंतःकरणाने ह्या रात्री तुझ्याकडे येत आहोत. आम्ही भुकेलेले आणि तहानलेले, असे येत आहोत, आणि आम्हाला ठाऊक आहे तु तुझे वचन पाळशील.

16 जसे आम्ही ह्या बायबलची पवित्र पाने उघडण्याचा प्रयत्न करीत आहोत, ह्यासाठी की ह्यातील गोष्टी वाचाव्या, पवित्र आत्मा ह्या गोष्टी प्रत्येक अंत:करणापर्यंत पोहचवो. आणि ते बीज खोल, चांगल्या विश्वासामध्ये पडो की ते प्रत्येक अभिवचन उपजवो जे वचनामध्ये केले आहे. प्रभू, आमचे ऐक, आणि आम्हास शुध्द कर, आणि आमची परीक्षा कर. आणि जर तेथे आमच्याविषयी काही अशुध्द गोष्ट असेल, प्रभू, काही कबूल न केलेले पाप, काहीही जे बरोबर नाही, आम्हाला आता ते प्रगट कर, प्रभू, आम्ही सरळ मार्गाने चालू आणि ते करु, कारण आम्ही जाणतो की आम्ही प्रभू येशूच्या येण्याच्या छायेत राहत आहोत. आणि हे पवित्र देवा! आम्ही तुझ्या छायेत आलो आहोत तुझ्या—तुझ्या न्यायाकडे ह्या रात्री आलो आहोत, आणि आम्ही नव्याने समर्पणासाठी आणि अभिषेकासाठी, आणि आमच्या जीवनात पवित्र आत्मा भरण्यासाठी विनवणी करीत आहोत.

17 पाहात आहोत की संजीवनाचा अग्नी मंद होण्यास सुरुवात झाली आहे, आपण वचनाचे लाकूड फेकूया, तो नविन अग्नी प्रदीप्त करील, की आमची अंत: करणे उत्साहाने भरतील. प्रभू, आम्हास शुध्द कर, तुझ्या मौल्यवान वचनाने आणि तुझ्या रक्ताने, आणि तुझ्या कृपेने, आम्ही विनंती करतो. आणि सर्व धन्यवाद आणि प्रशंसा, तुझी असेल. सर्व पूर्वग्रहदोष आमच्या अंतःकरणातून काढ. आम्हाला शुध्द कर, हे प्रभू, आम्हाला शुध्द अंतःकरण, आणि शुध्द हात, आणि शुध्द मन दे, की आम्ही तुझ्या पवित्र स्थानात, अनेक रात्री येऊ, आनंद करीत आणि तुझ्या आत्म्याने भरलेले. आम्ही हे येशूच्या नावाने, आणि त्याच्यासाठी मागतो. आमेन.

18 मी आता वचन वाचू इच्छितो. आणि जेव्हा...मी तुम्हाला तुमचे बायबल, तुमच्या पेन्सिली, तुमचे कागद, वचन लिहीण्यासाठी आणण्यास सांगतो. जर तुमची तशी इच्छा असेल तर, तर ते अधिक चांगले होईल. आणि आता जेव्हा तुम्ही प्रेषितांची कृत्ये 7वा अध्याय काढत आहात, सुरुवात करताना; ह्या प्रश्नाचे उत्तर द्या, किंवा ह्या प्रश्नाचे उत्तर देताना सुरुवात करा: *पवित्र आत्मा काय आहे?*

19 तेथे असे काही नाही जे सैतानाचा पराभव करील, तेथे पृथ्वीवर अजून पर्यंत काहीही नव्हते जे सैतानाचा पराभव करील, देवाच्या वचनासारखे. येशूने त्याच्या मोठ्या लढाईत त्याचा उपयोग केला; त्याने म्हटले, "असे लिहीले आहे..."

20 आणि ह्या सकाळी, जेव्हा जेव्हा मी ऐकत होतो, काही दिवसांअगोदर, एक प्रक्षेपित केलेले भाषण जे असे सांगू इच्छित होते की निर्मीती राखेतून आली जी एकत्र उडविली गेली, आणि काही फॉस्फेट नावाचा क्षार, आणि पृथ्वीच्या काही रासायनिक द्रव्याने, आणि उबदार सूर्यप्रकाशाने जीवनाचे जंतू निर्माण केले आणि जीवन बाहेर आणले. किती हास्यास्पद आहे! जेव्हा, सूर्यप्रकाश कोणत्याही जीवनाच्या जंतूला मारुन टाकील. एक जंतू बाहेर सूर्यप्रकाशामध्ये ठेवा, तो त्याला लगेच मारुन टाकील. आणि तेथे अशी कुठलीही गोष्ट नाही; परंतु सैतान मला ठोसा मारण्याचा प्रयत्न करीत आहे. आणि मी ह्या सकाळी लहान रिबेकेला शाळेत सोडल्यानंतर, आणि परतीच्या मार्गावर, मी पुन्हा रेडिओ चालू केला; आणि मला वाटले मला पुन्हा त्या गोष्टी ऐकायला मिळतील, म्हणून मी तो बंद केला.

आणि जसे मी रस्त्यावरुन जात होतो, सैतान मला म्हणाला, "काय तुला ठाऊक आहे हा मनुष्य ज्यास तू येशू म्हणतोस तो एक मनुष्य होता, एके दिवशी त्याच्या दिवसात, बीली ग्रॅहम किंवा ओरल रॉबर्टसारखा. तो केवळ एक मनुष्य होता की त्यांनी काही लोकांना त्याच्या सभोवती जमवायला सुरुवात केली आणि तो एक थोर मनुष्य आहे

असे म्हणण्याकरिता, आणि काही काळानंतर तो थोर झाला; आणि मग तो त्यांच्यासाठी एक——एक देव बनला. आणि तो मेल्यापासून, आता ते सर्वत्र जगभर पसरले आहे, आणि हेच सर्व आहे."

21 मी विचार केला, "किती खोटा तू आहेस!" आणि मग मी वळलो जेव्हा मी ग्रॅहम स्ट्रीट ओलांडीत होतो. मी म्हटले, "सैताना, तू जो माझ्या सद्सद्विवेकबुध्दीशी बोलत आहेस, मला तुला काही गोष्टी विचारायला आवडेल. तो कोण होता ज्याविषयी इब्री संदेष्टे बोलले की तो येईल? अभिषिक्त मसीहा कोण होता? त्या मनुष्यावर काय होते ज्यांनी, तो येथे येण्याच्या हजारो वर्षांअगोदर, त्याला अगाऊ पाहिले आणि त्याचे जीवन सांगितले? तो कोण होता ज्याने ह्या गोष्टी अगाऊच सांगितल्या आणि जेव्हा तो आला, त्यांनी म्हटले, 'त्याला गुन्हेगारांबरोबर गणण्यात आले,' आणि तो होता. 'आपल्या अपराधांमुळे तो घायाळ झाला,' आणि तो होता. 'त्याला धनवंताची कबर देण्यात आली, परंतु तो तिसऱ्या दिवशी उठला,' आणि त्याने केले. आणि मग त्याने पवित्र आत्म्याचे अभिवचन दिले, आणि मला तो मिळाला. म्हणून तू माझ्यापासून दूर जा, कारण असे वचनात लिहीले आहे, आणि प्रत्येक वचन खरे आहे." मग तो निघून गेला, फक्त त्याला वचन द्या, ते काम करते. तो वचनापुढे उभा राहू शकत नाही, कारण ते प्रेरणेने आले आहे.

आपण ह्या रात्री प्रेषितांची कृत्ये ह्या पुस्तकांतील 7वा अध्याय वाचूया.

*प्रमुख याजक म्हणाला, ह्या गोष्टी अशाच आहेत काय?*

*तेव्हा तो म्हणाला, बंधुजनहो व वडिलांनो ऐका. आपला पूर्वज अब्राहाम हारान प्रांतात जाऊन राहण्यापूर्वी मेसोपटेम्या देशात असता, गौरवशाली देवाने त्याला दर्शन देऊन म्हटले,*

*तू आपला देश व आपले नातलग सोडून मी तुला दाखवीन त्या देशात चल.*

*तेव्हा तो खास्द्यांच्या देशात जाऊन राहीला; मग त्याचा बाप मेल्यावर देवाने त्याला तेथून काढून सध्या तुम्ही राहता त्या देशात आणले,*

*पण त्यात त्याला वतन दिले नाही, पाऊलभर देखील जमीन दिली नाही. त्याला मूलबाळ नव्हते तरी हा देश त्याच्या व त्याच्यामागे त्याच्या संततीच्या स्वाधीन कायमचा करण्याचे अभिवचन देवाने त्याला दिले.*

*...देवाने आणखी असे सांगितले की, त्याची संतती परदेशात जाऊन उपरी होईल, आणि ते लोक त्यांना दास करुन चारशे वर्षे जाचतील.*

*ज्या राष्ट्राच्या दास्यात ते असतील, त्याचे पारिपत्य मी करीन, असे देवाने सांगितले. आणि त्यानंतर ते तेथून निघून माझी सेवा ह्या स्थळी करितील.*

*त्याने त्यांना सूंतेचा करार लावून दिला. हा करार झाल्यानंतर अब्राहामाला इसहाक झाला; त्याची त्याने आठव्या दिवशी सुंता केली; मग इसहाकाला याकोब झाला व याकोबाला बारा कुलपति झाले.*

22 ह्या ठिकाणी, आम्ही विषयापर्यंत पोहचू शकतो, जो माझ्या विचाराप्रमाणे आजचा उत्कृष्ट विषय आहे...*पवित्र आत्मा काय आहे?* तो काय आहे? आणि, आता, मी हा विषय घेण्याचे कारण हे आहे की, तुम्ही येऊ शकत नाही आणि पवित्र आत्मा प्राप्त करु शकत नाही जोपर्यंत तुम्हाला माहीत नाही की तो काय आहे. आणि तुम्ही तो प्राप्त करु शकत नाही, जर तुम्ही जाणता की तो काय आहे, जोपर्यंत तुम्ही विश्वास ठेवत नाही की तुम्हाला तो दिला आहे, आणि तो तुम्हाकारिता आहे. आणि, मग, तुम्ही समजू शकत

नाही की तुमच्याकडे तो आहे, किवा नाही, जोपर्यंत तुम्हाला समजत नाही की त्याचा काय परिणाम आहे. म्हणून तुम्ही जाणता की तो काय आहे, आणि तो कोणाचा आहे, आणि जेव्हा तो येतो तो काय क्रिया करतो, तेव्हा तुम्हाला समजेल तुम्हाला काय मिळाले आहे जेव्हा तो तुम्हाला मिळेल. समजले? तेव्हा तुम्ही स्थिरस्थावर व्हाल.

23 अशाचप्रकारे मी आमचे भाऊ जेफ्रिस ह्यांच्याशी आज बोलत होतो, आणि त्याने म्हटले, “मला आज रात्री सभेला उपस्थित राहणे आवडेल, परंतु मी तेथे उद्या रात्री असेन.” त्याला माहीत नव्हते की सभा चालू होत्या कारण आम्ही त्याची घोषणा केली नव्हती; येथे आताच. काही जण...भाऊ लिओ आणि त्यांच्यातील काहींनी आमच्या मित्रांना लिहीले आणि त्यांना सांगितले, जे शहरा बाहेरचे होते. बरे, कारण आपल्याकडे खोल्या नव्हत्या.

24 आता मी म्हणालो, “भाऊ जेफ्रिस, जर तुम्ही मला खाली तुमच्या एका तेलाची विहीर चालू करण्यास पाठवले, आणि मला त्याविषयी काहीच ठाऊक नाही, मी कदाचित ती फोडून टाकेन. मी कदाचित चुकीची चावी फिरवेन किंवा चुकीची मोटर चालू करेन. मला ते करण्याआधी ती कशी चालू करावी ह्याविषयी माहिती करुन घ्यावी लागेल.”

आणि तशाचप्रकारे पवित्र आत्मा प्राप्त करुन घेण्यासाठी मार्ग आहे. तुम्हाला जाणले पाहिजे तुम्ही कशाकरिता आला आहात, आणि तो कसा मिळवावा, आणि तो काय आहे.

आता, प्रथमतः, पवित्र आत्म्याचे अभिवचन देण्यात आले आहे.

25 आपण दहा आठवडे घेऊ शकलो असतो आणि कधीच नाही...ह्या विषयाची तीक्ष्ण बाजू गाळा, पवित्र आत्मा काय आहे. परंतु, प्रथम गोष्ट, माझी इच्छा आहे की तुम्हाला प्रत्येक रात्री तेथे पोहचण्यासाठी फक्त रुपरेषा द्यावी, मग पुढच्या रात्री पाहूया जर तेथे काही प्रश्न असतील.

26 येथे किती जण आहेत ज्यांना पवित्र आत्मा प्राप्त झाला नाही, पवित्र आत्म्याने बाप्तिस्मा झाला आहे? तुमचे हात वर करा; तुम्हाला माहीत आहे तुम्हाला मिळाला नाही. त्या हातांकडे पाहा

आता मी ह्यावर बोलू इच्छितो, कारण पवित्र आत्मा एक चिन्ह आहे, कारण ते एक चिन्ह आहे. आम्हाला कळले आहे की, की सर्व अभिवचने आपल्याला देण्यात आली... अब्राहाम अभिवचनाचा पिता होता, कारण देवाने अब्राहामाला अभिवचन दिले आणि त्याच्यानंतर त्याच्या संततीला. अभिवचन “अब्राहामाला आणि त्याच्या संततीला” दिले होते. आणि हे चिन्ह कराराच्या लोकांना आहे.

27 आता, तेथे फार मोठा फरक केवळ एक ख्रिस्ती आणि पवित्र–आत्म्याने–भरलेला ख्रिस्ती ह्यामध्ये आहे. आणि आणि आता आपण हे वचनांतून पाहणार आहोत, आणि ते तंतोतंत वचनामध्ये पाहणार आहोत. प्रथमतः, तेथे एक ख्रिस्ती आहे जो स्वतःला ख्रिस्ती म्हणत आहे. परंतु जर हा ख्रिस्ती अजूनही पवित्र आत्म्याने भरलेला नाही, तो केवळ ख्रिस्ती होण्याच्या प्रक्रियेत आहे. समजले? तो कथित विश्वास करतो, तो त्यावर काम करीत आहे, परंतु देवाने त्याला अजूनही तो आत्मा, पवित्र आत्मा दिलेला नाही. तो अजून देवाबरोबर त्या ध्येयापर्यंत पोहचला नाही, देवाने ते ओळखले आहे.

28 कारण, देवाने अब्राहामाबरोबर एक करार केला, मग त्याला अब्राहाम असे म्हटले, तेच आज विश्वासणाऱ्याचे पाचारण दर्शवते.

त्याने अब्राहामाला बोलावले, आणि अब्राहाम त्याच्या देशातून निघाला आणि एका परक्या देशात गेला, परक्या लोकांत राहण्यास गेला, आणि ते एक दर्शक होते जेव्हा देव

एका मनुष्यास बोलावतो त्याचा नीचपणा थांबवण्यास सांगतो, त्याच्या पापाचा पश्चाताप करण्यास सांगतो. तो त्याला त्या समुहामधून वळवतो ज्यात तो होता, एका नविन समुहात, नविन प्रकारच्या लोकांत राहण्यासाठी.

आणि जेव्हा देवाने अब्राहामाला त्याच्या वचनाशी विश्वासयुक्त असलेले पाहिले जे देवाने त्याला दिले होते, की त्याला पुत्र होईल, आणि त्या पुत्राद्वारे सर्व पृथ्वी आशीर्वादीत होईल, तेव्हा देवाने त्याचा विश्वास कायम केला त्याला एक चिन्ह देण्याद्वारे, आणि ते चिन्ह सुंता होते. आणि सुंता हे पवित्र आत्म्याचे एक दर्शक आहे.

29 ह्या अध्यायातील पुढची वचने जी आपण आता वाचली, जर तुम्हाला ती टिपून ठेवायची असेल. आणि...स्तेफन म्हणाला, 51व्या वचनात.

> *अहो ताठ मानेच्या...आणि हृदयांची व कानांची सुंता न झालेल्या लोकांनो, तुम्ही तर पवित्र आत्म्याला सर्वदा विरोध करिता: जसे तुमचे पुर्वज तसेच तुम्हीही.*

30 सुंता ही पवित्र आत्म्याला दर्शवते. आणि देवाने अब्राहामाला ते—ते सूंतेचे चिन्ह दिले जेव्हा त्याने देवाचा त्याच्या अभिवचनाप्रमाणे स्विकार केला आणि परक्या देशात निघून गेला. समजले? ते एक चिन्ह होते.

आणि त्याची सर्व लेकरे, आणि त्याची संतती त्याच्यामागे, त्यांच्या देहात हे चिन्ह असेल, कारण ती एक गुणवत्ता होती. ती त्यांना इतर सर्व लोकांपासून विभक्त करण्यासाठी होती, हे सूंतेचे चिन्ह.

31 आणि तेच आहे ज्याचा आज देव उपयोग करीत आहे. ते हृदयाच्या सुंतेचे चिन्ह आहे, पवित्र आत्मा, तीच देवाची मंडळी, एक वेगळी मंडळी सर्व इतर पंथ, विश्वास आणि संप्रदाय ह्यापासून. ते सर्व प्रकारच्या संप्रदायात आहेत, परंतु तरीही ते एक वेगळे केलेले लोक आहेत. तुम्ही मला एका मनुष्याशी दोन मिनिटे बोलू द्या, मी तुम्हाला सांगू शकेन की त्याला पवित्र आत्मा मिळाला आहे किंवा नाही. म्हणून तुम्ही करु शकता. ते त्यांना विभक्त करते. ती एक खूण आहे. ते एक चिन्ह आहे. आणि पवित्र आत्मा हे एक चिन्ह आहे. आणि ते आहे...

कोणीही लेकरु जे जुन्या करारात सूंतेला नाकारते, जी पवित्र आत्म्याची छाया आहे, तो लोकांमधून छेदला जाई. तो इतर मंडळीबरोबर सहभागिता करु शकत नसे, जर त्याने सुंता करण्यास नकार दिला.

आता तसेच आजही आहे. एक व्यक्ती जो पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा घेण्यास नकार देईल, तो पवित्र आत्मा असणाऱ्याबरोबर सहभागिता करु शकणार नाही. तुम्ही तसे करु शकत नाही तुम्हाला त्या स्वभावाचे व्हावे लागेल. जसे, ते...

32 माझी आई म्हणत असे, "एकाच पिसाचे पक्षी एकत्र राहतात." बरे, ती एक जूनी म्हण आहे, परंतु ती खरी आहे. तुम्ही कबुतर आणि कावळ्यांना सहभागिता करताना पाहत नाही. त्यांचे अन्न वेगळे आहे. त्यांच्या सवयी वेगळ्या आहेत. त्यांच्या इच्छा वेगळ्या आहेत.

आणि तशाच प्रकारे ते जग, आणि ख्रिस्ती लोकांबरोबर आहे जेव्हा तुमची *सुंता* पवित्र आत्म्याद्वारे केली गेली आहे, ज्याचा अर्थ, "अग्रत्वचा कापणे आहे."

33 सुंता केवळ पुरुषांची होऊ शकते. परंतु जर स्त्री पुरुषाशी विवाहीत झालेली होती, ती त्याचा भाग होती, तीची त्याच्याबरोबर सुंता झालेली होती. तुम्हाला ठाऊक आहे,

तीमथ्याला पत्रामध्ये, जेथे असे सांगितले आहे, “तथापि मर्यादेने विश्वास, प्रीति व पवित्रता ह्यात त्या राहिल्यास बालकाला जन्म देण्याच्या योगे त्यांचे तारण होईल.”

34 आता, सुंता. तुम्हाला ठाऊक आहे जेव्हा...सारा तिच्या डेऱ्यात मागे हसली, देवदूताच्या संदेशावर, जेव्हा त्याने म्हटले, “अब्राहाम,” त्याला तो कोण होता हे ठाऊक नव्हते, एक अनोळखी, “तुझी पत्नी सारा कुठे आहे?” त्याला कसे ठाऊक की त्याला एक पत्नी आहे.

35 जसे येशूने म्हटले, “जसे लोटाच्या दिवसात होते, तसे मनुष्याच्या पुत्राच्या येण्याच्या वेळी होईल.” स्मरण करा, ती चिन्हे सदोम आणि गमोरात, जगात, धार्मिक लोकांमध्ये घडली नव्हती. परंतु ते निवडलेल्यांकरिता, बोलाविलेल्यांकरिता होती. आणि अब्राहाम बोलावलेला होता. आणि शब्द *मंडळी* म्हणजे, “बोलावलेले, वेगळे केलेले,” जसे अब्राहामाने स्वतःला वेगळे केले होते आणि त्याची सूंता केलेली होती.

आणि तेव्हा जेव्हा सारा दूताच्या संदेशावर हसली, देवाने त्याचवेळी तिला मारले असते, परंतु तो तिला उपद्रव करु शकत नव्हता अब्राहामाला उपद्रव केल्याशिवाय, कारण ते दोघे एक होते. ती त्याचा भाग होती. “तुम्ही आता दोघे नाही, परंतु एक आहात.”

36 म्हणून, सुंता, पवित्र आत्मा आज हृदयाची सुंता करतो. आणि ते एक चिन्ह आहे, एक दिलेले चिन्ह.

कोणीतरी त्या दिवशी म्हटले...मी ते केवळ पुन्हा सांगतो, एक विनोद म्हणून नाही. कारण, ते एक सत्य आहे, परंतु ते एक विनोदासारखे भासते. जसे मी नेहमी सांगतो, ही विनोद करण्याची जागा नाही. परंतु तेथे एक लहानसा जर्मन पश्चिम किनाऱ्यावर होता, जेथे आपण होतो. त्याला पवित्र आत्मा मिळाला. आणि तो रस्त्यावरुन खाली गेला, आणि तो थोडेसे पुढे चाली, आणि तो त्याचे हात वर करी आणि अन्य भाषेत बोलत असे आणि तो धावायला लागे, आणि तो उड्या मारी, आणि तो ओरडत असे. आणि तो त्याच्या कामात होता, अशाच प्रकारे करीत होता, आणि त्याच्या मालकाने त्याला सांगितले, “तु कोठे जाऊन आलास?” हू–हू. मला ती ठिकाणे आवडतात जेथून तू जाऊन आला आहेस. त्याने म्हटले, “तू नक्कीच खाली त्या वेड्यांच्या समुहात जाऊन आला आहेस.”

त्याने म्हटले, “म्हणजे तुला वाटते की ते वेडे आहेत?”

त्याने म्हटले, “नक्कीच, ते आहेत.”

37 त्याने म्हटले, “बरे, प्रभूची स्तुती होवो त्या वेड्यांबद्दल!” आणखी त्याने म्हटले, “तुला ठाऊक आहे काय? वेडे मोठी भूमिका पार पाडतात.” त्याने म्हटले, “उदाहरणार्थ, एक गाडी, तू त्याचे सर्व नट बाहेर काढले, तुझ्याकडे काहीच राहणार नाही परंतु पत्र्याचा ढीग राहील.” म्हणून ते अगदी खरे आहे.

38 जेव्हा तुमच्यामध्ये पवित्र आत्मा येतो, तुम्ही इतके वेगळे होता, तोपर्यंत ह्या जगाचे थोर विचारवंत तुम्हाला पसंत करीत नाही, आणि ते तुमच्याविरुध्द होतात, आणि त्यांना तुमच्याबरोबर काही करायची इच्छा राहत नाही. तुम्ही अगदी परके होता, दहा पटीने परके तुम्ही होता, जर तुम्ही आफ्रिका जंगलाच्या आतील प्रदेशात गेला त्यासारखे. जेव्हा पवित्र आत्मा येतो तुम्ही वेगळे होता, आणि ते एक चिन्ह आहे. लोकांमध्ये ती एक खूण आहे.

39 आता, तुम्ही म्हणाल, “तर मग, भाऊ ब्रॅन्हम, सुंतेचे चिन्ह अब्राहामाला दिले होते?” ते खरे आहे. “आणि त्याच्या संततीला?” होय.

40 ठीक आहे, आता आपण गलतीकरांस पत्र, 3रा अध्याय, 29व्या वचनाकडे वळणार आहोत, आणि पाहणार आहोत की हे आपल्याला कसे लागू होते. गलतीकरांस पत्र 3:29, आणि पाहूया सूंता परराष्ट्रीयांना कशी लागू होते. जर आपण परराष्ट्रीय आहोत; जे नैसर्गिक जन्माद्वारे आपण आहोत.

आता, प्रथम, 16 वे वचन वाचू इच्छितो.

*आता अब्राहामाला आणि त्याच्या संतानाला ती अभिवचने सांगितली होती.* (अब्राहाम, आणि त्याचे संतान!) *तो म्हणत नाही, आणि तुझ्या संतानाला...*

कोणीही...म्हणेल, "ओह, मी सुध्दा अब्राहामाचे संतान आहे." नाही. "संतान" अब्राहामाचे संतान!

*...संतानांना असे पुष्कळ जणांसंबंधाने तो म्हणत नाही; तर तुझ्या संतानाला असे एकाविषयी तो म्हणत आहे, आणि तो एक ख्रिस्त आहे.*

41 ख्रिस्त अब्राहामाचे संतान होता. तुम्ही ह्यावर विश्वास ठेवता? [मंडळी म्हणते, "आमेन."—सम्पा.] ठीक आहे, आता 28 व्या आणि 29 व्या वचनाकडे वळूया.

*यहूदी व हेल्लेणी, गुलाम व स्वतंत्र, पुरुष व स्त्री, हा भेदच नाही, कारण तुम्ही सर्वजण ख्रिस्त येशूच्या ठायी एकच आहात;*

*आणि तुम्ही जर ख्रिस्ताचे आहा तर अब्राहामाचे संतान आणि अभिवचनाच्याद्वारा वारीस आहा.*

आपण "अब्राहामाचे संतान" कसे होतो? ख्रिस्तामध्ये असल्याकारणाने आपण अब्राहामाचे संतान आहोत. आणि अब्राहामाचे संतान कोण होते? जसे, आपण रोमकरांस पत्र 4 आणि निरनिराळ्या जागी त्याविषयी पाहू शकतो.

अब्राहामाला त्याची सुंता झाल्यावर कधीच हे अभिवचन मिळाले नाही. सूंता दाखवणे हे एक केवळ दर्शक आहे, त्याला हे अभिवचन सुंता होण्यापूर्वीच मिळाले होते. आणि ते एक दर्शक होते, त्याच्या विश्वासाची मान्यता जी त्याला त्याची सूंता होण्याअगोदर मिळाली होती.

42 आता, जेव्हा आम्ही ख्रिस्तात आहोत, आम्ही अब्राहामाचे संतान बनतो आणि, ख्रिस्ताबरोबरचे वारीस, मग, कोणीही असो, यहुदी किंवा हेल्लेणी.

आणि, "अब्राहामाचे संतान," अब्राहामाच्या संतानाकडे अब्राहामाचा विश्वास आहे, जो देवाला त्याच्या वचनाप्रमाणे घेतो. ह्याची पर्वा नाही की ते कितीही हास्यास्पद वाटो, किती वेगळ्याप्रकारे तुम्ही कृती करता, किती असाधारण ते तुम्हाला बनवते, तुम्ही देवाचे वचन कशाचीही पर्वा न करता घेता.

43 अब्राहाम पंच्याहत्तर वर्षांचा, आणि सारा पासष्ट वर्षांची, देवाला त्याच्या वचनानुसार घेतले, आणि जे अस्तित्वात नव्हते जरी ते सर्व गोष्टींच्या विरुध्द होते, त्यावर विश्वास ठेवला. तुम्हाला काय वाटते त्यावेळच्या डॉक्टरांनी काय विचार केला असेल? लोकांनी काय विचार केला असेल असे तुम्हाला वाटते, जेव्हा त्यांनी पंच्याहत्तर वर्षांच्या, वृध्द मनुष्याला पाहिले, सगळीकडे देवाची स्तुती करताना, त्याला त्याच्या पत्नीद्वारे, "एक पुत्र होणार आहे," आणि ती पासष्ट वर्षांची, जिचा मासिक धर्म जवळ-जवळ पंचवीस वर्षांअगोदर बंद झाला आहे? परंतु, तुम्ही पाहता, त्यामुळे तुम्ही मजेशीर वागता, अब्राहामाचा विश्वास.

44 आणि जेव्हा तुमची पवित्र आत्म्याने सुंता होते, तुमच्याबरोबर ह्याच गोष्टी होतात. ते तुम्हाला अशा गोष्टी करायला लावते ज्याचा तुम्ही विचार केला नव्हता की तुम्ही कराल. ते तुम्हाला देवाचे अभिवचन घ्यायला आणि देवावर विश्वास करण्यास लावते.

45 आता, ते एक—एक अभिवचन आणि एक चिन्हही आहे, त्या खेरीज, तो एक शिक्का ही आहे. आता, जर तुम्ही माझ्यासह रोमकरांस पत्रात जाल. प्रथम, मी तुम्हाला माझ्यासह इफिसकरांस पत्र 4:30 मध्ये घेऊन जाऊ इच्छितो, आणि आपण येथे वाचूया केवळ एका मिनीटासाठी. इफिसकरांस पत्र 4:30 हे म्हणते.

आता, तुम्ही पुष्कळ लोकांना असे सांगताना ऐकले आहे की निरनिराळ्या गोष्टी शिक्के आहेत. "जर तुम्ही मंडळीत जाता, तुम्हाला मंडळीचा शिक्का मिळतो." आणि काही लोक म्हणतात, "ते एखाद्या दिवसाचे पालन करणे, शब्बाथ दिवस, तो—तो देवाचा शिक्का आहे." त्यांच्यातील काहीजण म्हणतात, "जर आपण एका विशिष्ट संप्रदायाचे सदस्यत्व घेतले, तर आपण देवाच्या राज्याचा शिक्का मिळवतो."

46 आता, बायबल म्हणते, "प्रत्येक मनुष्याचा शब्द खोटा ठरो, आणि देवाचा खरा ठरो." आता, इफिसकरांस पत्र 4:30 मध्ये असे लिहीले आहे.

*आणि देवाच्या पवित्र आत्म्याला खिन्न करु नका; खंडणी भरुन प्राप्त केलेल्या मुक्तीच्या दिवसापर्यंत तुम्ही त्या आत्म्याच्या योगे मुद्रीत झाला आहा.*

47 मी ह्यावर अधिक जोर देणार आहे; आता, तुम्ही विधिज्ञ बंधुजन काही वेळाकरिता शांतता राखा. समजले? तुम्ही निरीक्षण केले की किती वेळ तो शिक्का राहतो? दुसऱ्या संजीवनापर्यंत नाही, दुसऱ्या वेळेपर्यंत काहीतरी चुकीचे घडते. "तुमच्या मुक्तीच्या दिवसापर्यंत." जेव्हा तुमची मुक्ती देवाबरोबर राहण्यासाठी होईल, तोपर्यंत पवित्र आत्मा तुम्हाला मुद्रीत करतो. एका संजीवनापासून दुसऱ्या संजीवनापर्यंत नाही; परंतु अनंतकाळापासून अनंतकाळापर्यंत, तुम्ही पवित्र आत्म्याद्वारे मुद्रीत झाला आहात.

तोच पवित्र आत्मा आहे, तो देवाचा शिक्का आहे, की त्याला मिळाली आहे...तुम्हाला त्याच्या दृष्टीत कृपा सापडली आहे, आणि तो तुमच्यावर प्रेम करतो, आणि तो तुमच्यावर विश्वास ठेवतो, आणि त्याने त्याचा शिक्का तुमच्यावर लावला आहे. शिक्का काय आहे? कोणी...का, एक *शिक्का* दर्शवितो किंवा म्हणजे एक "पूर्ण काम." आमेन. देवाने तुम्हाला वाचवले आहे, पवित्र केले आहे, तुम्हाला शुध्द केले, तुमच्यावर कृपा केली, आणि तुम्हावर शिक्का मारला आहे. त्याने पूर्ण केले आहे. तुम्ही त्याचे फळ आहात तुमच्या मुक्तीच्या दिवसापर्यंत. *शिक्का* मारलेले म्हणजे, "पूर्ण गोष्ट."

पवित्र आत्मा काय आहे? ते एक चिन्ह आहे. आपण त्याकडे थोडा वेळाने जाणार आहोत. दुसऱ्या संदेशात, एक चिन्ह ज्याविषयी पौलाने सांगितले आहे. अन्यभाषा हे विश्वासणाऱ्यासाठी किंवा, अविश्वासणाऱ्यांसाठी एक चिन्ह होते.

48 आता लक्ष द्या, परंतु, ह्यामध्ये, पवित्र आत्मा एक चिन्ह आहे. माझा अर्थ...आणि पवित्र आत्मा एक शिक्का आहे. हे एक चिन्ह आहे. जे देवाने त्याच्या निवडलेल्या लेकरांना दिले आहे. ते नाकारणे म्हणजे त्या लोकांमधून छाटले जाणे आहे; आणि ते स्विकारणे म्हणजे, जगातून आणि जगातल्या सर्व गोष्टींपासून अलिप्त होणे, आणि अशी उत्पत्ती होणे ज्यावर देवाने मंजूरीचा शिक्का मारला आहे.

49 मी रेलरोड ह्या कंपनीकरिता येथे हॅरी वॉटरबेरी बरोबर काम करीत असे, आणि आम्ही खाली गाडी भरण्याकरीता जात असू. माझा भाऊ, डॉक मागे उभा राहून गाड्या भरण्याकरिता मदत करीत असे. जेव्हा कार भरण्यात येत असे, तेव्हा गाडीची पाहणी

करत असत, निरीक्षक, आणि जर त्याला काही सुट्टे भाग आढळले, जेथे ते पडतील आणि तुटतील, किंवा असे काही जे नुकसान करतील, तो त्या गाडीवर शिक्का मारणार नाही. जोपर्यंत ती गाडी पूर्णतः पॅक करीत नाही, जोपर्यंत ती अशी पॅक करीत नाही किंवा चांगल्या स्थितीत येत नाही, की कितीही प्रवासात हालली तरी त्या उत्पादनाला काही एक होणार नाही.

50 तेच कारण आहे आपणावर शिक्का मारु देत नाही; आपण गोष्टींविषयी खूप सैल असतो. जेव्हा निरीक्षक पाहतो, तुमच्या जीवनाचे निरीक्षण करण्यासाठी, पाहण्यासाठी की तुम्ही गोष्टींविषयी सैल नाही, तुमच्या प्रार्थनामय जीवनात थोडेसे सैल, त्या स्वभावाविषयी जरासे सैल, जीभेविषयी थोडेसे सैल, दुसऱ्यांविषयी बोलणे, तो कधीच गाडीवर शिक्का लावणार नाही. काही वाईट सवयी, काही अत्यंत घाणेरड्या गोष्टी, काही असभ्य वृत्ती, तो गाडीवर शिक्का लावू शकत नाही.

परंतु जेव्हा त्याला सर्व गोष्टी त्यांच्या जागेवर सापडतात, निरीक्षक, तेव्हा तो त्यावर शिक्का मारतो. कोण तो शिक्का उघडण्याची हिम्मत करील, जो ती कार तिच्या मुक्कामापर्यंत पोहचेपर्यंत ज्यासाठी तिच्यावर शिक्का मारण्यात आला आहे. तेथे ती आहे. "माझ्या अभिषिक्ताला स्पर्श करु नका; माझ्या संदेष्ट्यांना उपद्रव करु नका. कारण मी तुम्हास सांगतो, त्याच्या गळ्यात मोठ्या जात्याची तळी बांधून त्याला समुद्राच्या खोल पाण्यात बुडवावे ह्यात त्याचे हित आहे. ह्या लहानांतील एकाला जो अडखळवील किंवा हालवण्याचा प्रयत्न करील ज्याच्यावर शिक्का मारण्यात आला आहे." तुम्हाला समजते. ह्याचा काय अर्थ आहे?

51 तोच पवित्र आत्मा आहे. तो तुमची खात्री. तो तुमची सुरक्षितता आहे. तो तुमचा साक्षी आहे. तो तुमचा शिक्का आहे. ते तुमचे चिन्ह आहे, की "मी स्वर्गाशी बांधलेलो आहे. सैतान काय सांगतो ह्याची पर्वा करीत नाही. मी स्वर्गाशी बांधलेलो आहे. का? त्याने मला मुद्रीत केले आहे. त्याने मला तो दिला आहे. त्याने मला त्याच्या राज्यात मुद्रीत केले आहे आणि मी गौरवात बांधलो आहे! वारा वाहू दे! सैतानाला वाटेल ते करु दे. देवाने मला माझ्या मुक्तीच्या दिवसापर्यंत मुद्रीत केले आहे." आमेन! आमेन! तोच पवित्र आत्मा आहे. होय, तुम्हाला तो मिळाला पाहीजे. मी त्याशिवाय जाऊ शकत नाही. खूप काही तेथे सांगता येईल, परंतु माझी खात्री आहे तुम्हाला ठाऊक आहे की मला काय सांगायचे आहे.

52 आता, आपण योहान 14 काढूया, काही मिनीटांसाठी. मी वचनावर प्रेम करतो! ते सत्य आहे.

53 आता, देवाचा आत्मा, पवित्र आत्मा, पवित्र आत्मा काय आहे? तो ख्रिस्ताचा आत्मा आहे जो तुम्हामध्ये आहे. आता, आपण वाचण्याआधी, मला येथे काही टिप्पणी शब्द द्यायला आवडेल. पवित्र आत्मा काय आहे? तो एक शिक्का आहे. पवित्र आत्मा काय आहे? तो एक करार आहे. पवित्र आत्मा काय आहे? ते एक चिन्ह आहे. तर मग पवित्र आत्मा काय आहे? तो...येशू ख्रिस्ताचा आत्मा तुमच्यामध्ये आहे. समजले? "आता थोडाच वेळ!" येशूने म्हटले, "मग जग मला आणखी पाहणार नाही; पण तुम्ही मला पाहाल; कारण मी तुम्हाबरोबर राहीन, तुम्हामध्ये राहीन; जगाच्या अंतापर्यंत." देवाचा आत्मा त्याच्या मंडळीत!

54 कशाकरिता? त्याने ते कशाकरिता केले? हा थोडासा उद्या रात्रीचा विषय आहे. परंतु त्याने हे कशाकरिता केले? त्याने का केले? का पवित्र आत्मा...कशाकरिता, कशाकरिता

तो आला? तो तुम्हामध्ये कशाकरिता आला, तो माझ्यामध्ये कशाकरिता आला? देवाचे कार्य चालू ठेवण्याकरिता.

55 "मी सदैव माझ्या पित्याला आवडते तेच करतो. मी माझी इच्छा पूर्ण करण्यास आलो नाही. परंतु पित्याची ज्याने मला पाठवले आहे. आणि पिता ज्याने मला पाठवले आहे तो मजबरोबर आहे; आणि जसे माझ्या पित्याने मला पाठवले आहे, तसे मी तुम्हाला पाठवतो." ओह, माझ्या देवा! [भाऊ ब्रॅन्हम त्याच्या हातांनी दोनदा टाळ्या वाजवतात—सम्पा.] पित्याने त्याला पाठवले, त्याच्यामध्ये गेला. पिता ज्याने येशूला त्याच्यामध्ये पाठवले, त्याच्यामधून कार्य केले.

ज्या येशूने तुम्हाला पाठवले आहे, तुमच्याबरोबर जातो आणि तुमच्यामध्ये आहे. आणि जर तो आत्मा, येशू ख्रिस्तामध्ये होता, ज्याने त्याला त्याच्यासारखे करण्यास आणि वागण्यास लावले, तुम्हाला काही कल्पना येईल तो कसा कार्य करणार आहे जेव्हा तो तुमच्यात येईल, कारण ते जीवन बदलू शकत नाही, ते एका शरीरातून दुसऱ्या शरीरात जाईल, परंतु तो त्याचा स्वभाव बदलू शकत नाही, कारण तो देव आहे.

56 आता योहान 14 मध्ये, आपण थोडेसे वाचूया, 10 वचनापासून सुरुवात करुया.

> *मी...पित्यामध्ये आणि पिता माझ्यामध्ये आहे असा तू विश्वास धरीत नाहीस काय? ज्या गोष्टी...मी तुम्हाला सांगतो त्या मी आपल्या मनच्या सांगत नाही; परंतु माझ्यामध्ये राहणारा पिता स्वतःची कार्ये करतो. (ह्याचा आता विचार कर)*
>
> *मी पित्यामध्ये व पिता माझ्यामध्ये आहे हे माझे तुम्ही खरे माना; नाहीतर माझ्या कृत्यामुळे तरी माझे खरे माना.*
>
> *मी तुम्हाला खचित खचित सांगतो, मी जी कृत्ये करितो, ती माझ्यावर विश्वास ठेवणाराही करील, आणि त्यापेक्षा मोठी करील, कारण मी पित्याकडे जातो.*

तुम्ही हे पाहत नाही का? पाहा त्याने तेथे कसे म्हटले आहे? आता ह्याकडे लक्ष द्या, हे कसे झाले. मी थोडे पुढे आणखी वाचतो. आपण 20 व्या वचनापर्यंत वाचणार आहोत. "आणि तुम्ही काहीही मागाल..." आपण पाहूया, माझ्याकडे होतो..., होय. बरोबर आहे.

> *आणि पुत्राच्या ठायी पित्याचे गौरव व्हावे म्हणून तुम्ही जे काही माझ्या नावाने मागाल ते मी करीन.*
>
> *तुम्ही माझ्या नावाने माझ्याजवळ काही मागाल तर मी ते करीन.*
>
> *माझ्यावर तुमची प्रीती असली तर तुम्ही माझ्या आज्ञा पाळाल.*
>
> *आणि मी पित्याला विनंती करीन, मग तो तुम्हाला दुसरा कैवारी म्हणजे सत्याचा आत्मा देईल; अशासाठी त्याने तुम्हाबरोबर सदासर्वदा राहावे.*
>
> *जग त्याला ग्रहण करु शकत नाही, कारण ते त्याला पाहत नाही अथवा त्याला ओळखीत नाही; तुम्ही त्याला ओळखता, कारण तो तुम्हाबरोबर राहतो व तुम्हांमध्ये वस्ती करील.*

57 मग तो आत्मा कोण आहे? पवित्र आत्मा काय आहे? तो ख्रिस्त तुमच्यामध्ये आहे. तो कैवारी, तो पवित्र आत्मा आहे. "आणि जेव्हा तो कैवारी आला आहे. तो त्या गोष्टी करील ज्या मी केल्या आहेत. जेव्हा तो कैवारी माझ्यामध्ये होता. मी पित्याकडे प्रार्थना

करीन, आणि तो तुम्हाला हा कैवारी देईल. तुम्हाला तो कैवारी ठाऊक आहे. जग त्याला ओळखीत नाही, कधीच ओळखणार नाही. परंतु तुम्ही त्याला ओळखता कारण तो आता तुमच्यासह राहतो." येशूने म्हटले, "परंतु तो तो तुम्हामध्ये असेल." तेथे तुम्ही आहात, तो कैवारी आहे, "तुमच्यामध्ये असेल."

*मी तुम्हाला अनाथ असे सोडणार नाही, मी तुम्हाकडे येईन.*

"मी तुम्हाला सोडणार नाही…" आता, तो कैवारी, ख्रिस्त आहे. तोच तो पवित्र आत्मा आहे, ख्रिस्त आहे.

*आता थोडाच वेळ आहे, मग जग मला आणखी पाहणार नाही; पण तुम्ही मला पाहाल; मी जीवंत आहे म्हणून तुम्हीही…जीवंत राहाल.*

58 होय, आपण असे पुढे जाऊ शकतो; परंतु, तुम्हाला समजू दे. तो काय आहे? तो एक चिन्ह आहे. तो एक चिन्ह आहे. तो एक कैवारी आहे. पाहा तो काय सर्व आहे? अब्राहामाच्या संतानाला ते मिळते.

59 आता आपण हे ही शोधूया की…कैवारी आणखी काय आहे. आपण पाहिले योहान 16:7 कडे जाऊया, पाहूया जर तो एक वकील सुध्दा नाही का. तुम्ही जाणता की एक कैवारी काय असतो, कैवारी करणे. आपल्याकडे एक कैवारी आहे. आम्ही ते जाणतो. पहिले योहानाचे पत्र 16 वा अध्याय…एक मिनीट थांबा, मला क्षमा करा. संत योहान, ते आहे, 16:7. मला क्षमा करा. मला खात्री आहे. मला क्षमा करा. मी तसे म्हणालो, मी ते चुकीने वाचले…16:7

*तरी मी तुम्हाला खरे ते सांगतो; मी जावे हे तुमच्या हिताचे आहे, कारण मी न गेलो तर कैवारी तुमच्याकडे येणारच नाही; मी गेलो तर, त्याला तुमच्याकडे पाठवीन.*

*तो येऊन पापाविषयी, नीतिमत्वाविषयी व न्यायनिवाड्याविषयी जगाची खातरी करील;*

*ते माझ्यावर विश्वास ठेवीत नाहीत ह्यावरुन पापाविषयी;*

*मी पित्याकडे जातो आणि ह्यानंतर तुम्हांला मी दिसणार नाही ह्यावरुन नीतिमत्वाविषयी,*

*आणि ह्या जगाच्या अधिपतीचा न्याय झाला आहे, ह्यावरुन न्यायनिवाड्याविषयी.*

60 माझ्या देवा! आता, कैवारी, 1 ले योहान 2:12 मध्ये मिळतो. आता आपण ते वाचूया, फक्त एक मिनीट, पहिले योहान 2:12. मला तुम्ही क्षमा करा. 1 योहान…1 आणि 2, असे आहे. माझ्याकडे ते लिहीलेले आहे, पहिले योहान 2:1–2.

*अहो, माझ्या मुलांनो, तुम्ही पाप करु नये म्हणून हे मी तुम्हास लिहीतो. जर कोणी पाप केले, तर नीतिसंपन्न असा जो येशू ख्रिस्त तो पित्याजवळ आपला कैवारी आहे.*

कोण कैवारी आहे? येशू ख्रिस्त जो नीतिसंपन्न.

*आणि तोच—तोच आपल्या पापांबद्दल प्रायश्चित आहे; केवळ आपल्याच पापांबद्दल नव्हे तर सर्व जगाच्याही पापांबद्दल आहे.*

61 पवित्र आत्मा काय आहे? तो एक कैवारी आहे. काय करतो…एक कैवारी काय करतो? तो काय करतो? तो कैवार घेतो. त्याच्याकडे दया आहे. तो, तो तुमच्या जागी

उभा राहतो. तो, तो त्या गोष्टी करतो ज्या तुम्ही करु शकत नाही. तो—तो तुमच्या पापांबद्दल प्रायश्चित करतो. तो तुमचे नीतिमत्व आहे. तो तुमचे आरोग्य आहे. तो तुमचे जीवन आहे. तो तुमचे पुनरुत्थान आहे. तो ते सर्व आहे जे देव तुमच्यासाठी आहे. तो एक कैवारी आहे.

62 आपण ह्यात आणखी खोल कसे जाऊ शकतो आणि ते फोडू शकतो, कसे की जेव्हा तो आपल्या अज्ञानासाठी तो—तो मध्यस्थी करतो. कधीतरी जेव्हा...आपल्याकडे पवित्र आत्मा आहे, आपण अज्ञानाने काही गोष्टीत लटपटतो. पवित्र आत्मा तेथे आपला कैवार घेण्यासाठी असतो. तो आपला कैवारी आहे. तो उभा राहतो. तो आपला वकील आहे तो तेथे उभा राहतो आणि आपल्यासाठी विनवणी करतो. आपण आपल्यासाठी विनवणी करीत नाही, कारण पवित्र आत्मा आपल्यासाठी विनवणी करतो. पवित्र आत्मा बोलतो, कधीतरी बोलतो, कधीतरी शब्दांनी तुम्ही समजू शकत नाही, आणि तो आपल्यासाठी मध्यस्थी करतो. तोच पवित्र आत्मा आहे.

63 जेव्हा मी एखाद्या गोष्टीत चालतो, मी—मी एका लहान मुलासारखा चालतो; तुम्ही एका लहान मुलासारखे चालता. आपण, आपण एका अजाण जगात चालत आहोत जे शत्रूंनी, पापांनी, सापळ्यांनी सर्व गोष्टींनी भरलेले आहे.

तुम्ही म्हणता, “होय, मी घाबरतो. मी ख्रिस्ती जीवन स्विकारण्यास घाबरतो. मी हे करण्यास घाबरतो. मी घाबरतो मी हे करीन.”

घाबरु नका. आपल्याकडे एक कैवारी आहे. आमेन. होय, तो आपल्या बाजूने उभा राहतो. तो आपल्यामध्ये आहे, आणि तो आपल्याकरिता मध्यस्थी करतो. पवित्र आत्मा, सतत, सतत आपल्याकरिता मध्यस्थी करतो, सर्व समयी. तो आपला कैवारी आहे. ओह, आम्ही त्याकरिता देवाचे किती आभारी आहोत!

64 एक शिक्का, एक चिन्ह, जीवनाचा आत्मा, स्वर्गाचा परमेश्वर, एक सांत्वन करणारा, जीवन, कैवारी. तो कोण आहे? अरे, माझ्या देवा! आपण ह्यावर तासं-तास बोलू शकतो.

65 आता आपण एका मिनीटाकरिता बदलणार आहोत. आता आपण विचारणार आहोत...

अंतिम दिवसात आपल्याला अभिवचन दिले आहे! हा कैवारी, शिक्का, अभिवचन सर्वकाही ज्याविषयी आपण ह्या रात्री बोललो आहे, दशसहस्त्र पटीने अधिक आपल्याला अंतिम दिवसात ते अभिवचन देण्यात आले आहे.

त्यांना तो त्या दिवसात मिळाला नाही. त्यांना त्यांच्या देहात शिक्का देण्यात आला, एक विसार आणि एक चिन्ह म्हणून, विश्वास करुन की तो येणार होता, आणि ते त्या नियमशास्त्राच्या छायेत चालले. ज्याद्वारे, त्यांची शरीरात सूंता करण्यात आली.

66 आज आपण नियमशास्त्राच्या छायेत चालत नाही. आपण पुनरुत्थानाच्या सामर्थ्याने चालतो. आपण आत्म्याच्या सामर्थ्याने चालतो, जो आपला खरा शिक्का आहे, आपला खरा वकील आहे, आपला खरा कैवारी आहे, आपले खरे चिन्ह हे की आपण वरुन जन्मलो आहोत; विशेष, वेगळे लोक, मजेशीर वागणारे, देवाला त्याच्या वचनाप्रमाणे घेणारे, इतर सर्व गोष्टी चुकीच्या मानणारे. देवाचे वचन खरे आहे. ते...माझ्या देवा! तोच पवित्र आत्मा आहे.

67 काय तुम्हाला तो हवा आहे? तुम्हाला त्याला घेणे आवडेल की नाही? [मंडळी म्हणते, “आमेन”—सम्पा.] आपण पाहूया की त्याचे अभिवचन आपल्याला दिले होते की नाही.

आता आपण यशया, यशया पुस्तकाकडे वळूया. आपण यशया पुस्तकातील 28 वा अध्याय काढूया. आता आपण यशया 28 कडे जात आहोत, आपण ह्यापासून सुरुवात करणार आहोत…8 वे वचन काढूया, पाहूया यशयाने काय म्हटले आहे, सातशे बारा वर्षे तो येण्याआधी.

68 आपण ह्याविषयी खूप बोलू शकतो, मागे जा, खूप मागे, परंतु आपण येथून सुरुवात करणार आहोत. आणि पाहूया की मंडळीला ह्याचे अभिवचन दिले होते का. कोणत्या दिवशी तो येणार होता? अंतिम दिवसात, जेव्हा तेथे एक—एक भ्रष्टाचार. आता लक्षात घ्या, शब्द अनेक आहे, "दिवस," शेवटचे दोन दिवस, अंतिम दोन हजार वर्षे.

आता, आता 8 वे वचन.

*सर्व मेजे…वांतीच्या घाणीने भरली आहेत, निर्मळ जागाच उरली नाही.*

69 ते मिळण्याकरिता आज सभोवती शोधा. सभोवती पाहा आणि समजा जर आपण त्या दिवसात आहोत. "सर्व मेजे!" का ते प्रभू भोजन करण्यासाठी जातात. आणि पहिली गोष्ट, भौतिक गोष्टीत, एका जुन्या हलक्या पावाचा तुकडा किंवा एक प्रकारचे कुरकुरीत बिस्कीट घेतात, आणि ते तोडतात आणि प्रभू भोज करतात. जेव्हा ते वास्तविक पवित्र आत्म्याच्या हाताने, आणि बेखमीर भाकरीने करावयास हवे. ख्रिस्त घाणेरडा आणि अश्लील नाही, आणि त्याला ते दर्शवते.

70 दुसरी गोष्ट, ते लोकांना ते पेय देतात जे खोटे, चोरी, धुम्रपान, चावणे, (होय!) काहीही, जोपर्यंत ते मंडळीचा भाग आहे. त्यापासून दूर राहा! जर एखादा मनुष्य ते घेतो जेव्हा आपण येथे हे खातो, तो खाण्याने व पिण्याने आपणावर दंड ओढवून घेतो, प्रभूच्या शरीराचे मर्म ओळखीत नाही. जर तो ते जीवन जगत नाही, त्यापासून दूर राहा.

आणि जर तुम्ही ते घेत नाही, ते दाखवते की तुमची स्वतःची सदसदविवेकबुध्दी डागाळलेली आहे. "तो जो खात नाही, त्याला माझ्याबरोबर वाटा नाही," येशूने म्हटले.

71 परंतु सर्व प्रभूची मेजे घाणेरड्या गोष्टींनी भरली आहेत. तेथे निर्मळ जागा उरली नाहीत. लक्ष द्या, ते आजचेच चित्र नाही का!

*तो कोणाला…तो कोणाला ज्ञान शिकवितो? आणि कोणाला तो…संदेश समजावून सांगतो?*

*…कोणाला ज्ञान समजेल?…कोणाला तो संदेश समजावू शकतो?*

"बरे, देव धन्यवादीत असो, मी प्रेसबेटेरियन आहे. मी मेथडिस्ट आहे. मी पेंटेकॉस्टल आहे. मी नाजरीन आहे. मी पिलीग्रीम होलीनेस आहे." त्याने देवाला काहीही फरक पडत नाही; हे आणखी मेज.

*…कोणाला मी संदेश समजावून सांगू?…*

72 कोणत्या प्रकारची शिकवण; मेथडिस्ट, बाप्टिस्ट, प्रेसबेटेरियन, पेंटेकॉस्टल? बायबलची शिकवण!

…कोणाला मी *संदेश* समजावून सांगू…

73 जेव्हा तुम्हाला तो मिळेल तुम्ही कसे समजाल? आपण त्या शुक्रवारी रात्रीकडे जाऊया. समजले?

*…कोणाला संदेश समजावून सांगतो?* (आता लक्ष द्या) *दूध तुटलेल्यांस काय? थानतुट्या बालकांस काय?*

74 लहान बालके म्हणतात, “बरे, मी मंडळीत जातो. माझी आई त्या मंडळीची भाग आहे.” प्रिय भावा, मी त्याविरुध्द मूळीच नाही. आणि मी जाणतो हे ध्वनिमुद्रीत केले जात आहे. ते ठीक आहे. आईच्या मंडळीत जातो. परंतु, लक्षपूर्वक ऐका, आई एका प्रकाशामध्ये चालत आहे, तुम्ही दूसऱ्या प्रकाशात आहात.

75 लुथर एका प्रकाशात चालला; वेसली दुसऱ्या चालला. वेसली एका प्रकाशामध्ये चालत होता; पेंटेकॉस्ट दुसऱ्या चालले. परंतु आपण आजच्यापेक्षा उच्च पातळीवर चालत आहोत. आणि जर तेथे आणखी पीढी आली, तर ती आपल्याही पुढे जाईल.

76 मागील पूर्वीच्या दिवसात, जेव्हा गोष्ट विस्तीर्ण होती, मार्ग रुंद होता, लुथरने नीतीमत्व विश्वासाद्वारे मिळते हे शिकवले. ते केवळ लोकांना कॅथलिकवादाकडून प्रोटेस्टंटवादाकडे आणण्यासाठी होते, वचनाच्या सहभागितेत आणण्यासाठी. विश्वासाद्वारे नीतीमत्व, ते एक मोठे विस्तीर्ण वर्तुळ होते. ते त्यापासून हलले नाहीत.

77 त्याच्याबरोबर दुसरे संजीवन आले ज्याला जॉन वेस्ली म्हटले. ह्याने ते हादरले, आणि तिला त्यांनी खाली पवित्रीकरणाकडे आणले, एक चांगले, शुध्द, पवित्र जीवन, देवाच्या वचनाद्वारे शुध्द केलेले, जे तुमच्या अंतःकरणात आनंद निर्माण करते असे जगा. त्याने लुथरन शिकवणीला पुष्कळ हादरविले.

78 मग पेंटेकॉस्ट पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्यासह आला, आणि त्यास पुन्हा संकुचित केले, पवित्र आत्मा प्राप्त करण्याद्वारे. ते बरोबर आहे.

आणि आता ते हालविण्यास सुरुवात झाली. आणि ती दाने, आणि ती पुनर्स्थापना, आणि देवाचा आत्मा आत आला, चिन्हांनी आणि चमत्कारांनी परिपूर्ण, मंडळीत आला, आणि पेंटेकॉस्टला हालविले. ते काय आहे? आम्ही येशू ख्रिस्ताच्या आगमनाच्या इतके जवळ आहोत, जोपर्यंत तो आत्मा जो आत्मा त्याच्यात होता मंडळीत कार्य करीत आहे, त्याच गोष्टी करीत आहे ज्या त्याने केल्या जेव्हा तो येथे जगात होता. ते कधीच कुठे झाले नाही, प्रेषितांच्या समयापासून ते ह्या समयापर्यंत.

का? पाहा, तो रुंद होता; अरुंद, अरुंद, अरुंद झाला. ते काय आहे? अगदी तसेच जसा तुमचा हात छायेकडे येतो; निगेटिव्ह, निगेटिव्ह, निगेटिव्ह. परंतु ते काय आहे? ते प्रतिबिंब आहे. लूथर काय होता? ख्रिस्ताचे प्रतिबिंब होता. वेस्ली काय होता? ख्रिस्ताचे एक प्रतिबिंब.

79 पाहा, बीली संडेचे युग आताच संपले आहे. आणखी एके दिवशी, ज्येष्ठ डॉ. व्हीटनी ह्यांनी ह्याच मंचावर येथेच शिकवले, अंतिम प्राचीन पंथ, त्यांचा मृत्यू झाला, अंदाजे नव्वदाव्या वर्षी, मला वाटते. बीली संडे हे त्याच्या दिवसातील नामधारी मडळ्यांसाठी एक पुनरुत्थानवादी होते. त्यांनी कोणतेही आढेवेढे घेतले नाही. तेथे ते उभे राहिले आणि संपूर्ण सत्य सांगितले. “तुम्ही सर्व मेथडिस्ट असत्य मार्गापासून वेगळे व्हा, प्रचारक आणि सर्व! तुम्ही सर्व बाप्तिस्ट ह्या मुळमुळीत मार्गापासून वेगळे व्हा! तुम्ही प्रेसबेटेरियन!” त्याने कोणाला खुश करण्याचा प्रयत्न केला नाही. तो ह्या दिवसातील बीली ग्राहम होता.

80 लक्ष द्या. आणि मग, त्याचवेळी नामपात्र मंडळीत त्यांचे संजीवन आले होते, काय घडले? ‘द फुल गॉस्पल’ मध्येही संजीवन चालू होते. तेथे बोसवर्थ ब्रदर्स, स्मिथ विगल्सवर्थ, आणि डॉ. प्राईस, ॲमी मॅकफर्सन, ते सर्व आले.

पाहा, स्मिथ विगल्सवर्थ एके रात्री मृत्यु पावले. डॉक्टर प्राईस दुसऱ्या सकाळी मरण पावले. चोवीस तासांच्या आत मी कार्यक्षेत्रात आलो.

81 आता माझा माझा अंत ही येत आहे. येथे पाहा...तुम्ही बीली ग्राहमचे जास्त ऐकू नका. तुम्ही ओरल रॉबर्टसचे अधिक ऐकू नका. मी पाहत आहे की माझ्या सभा भ्रामक होत चालल्या आहेत. काय कारण आहे? आपण अंताकडे आहोत, दुसरे युग.

82 कशाप्रकारे बीली संडे आत आले, आणि इतर? ते एका महान मूडीच्या संजीवनानंतर आत आले. मूडी केव्हा आत आले? अगदी नॉक्स संजीवनानंतर. नॉक्स केव्हा आत आले? अगदी फिनीच्या संजीवनानंतर. फीनी कॅलवीन नंतर, कॅलवीन नंतर...तसेच, वेस्ली, आणि वेस्ली लुथरनंतर, युगांमधून ते आले आहे. जसे पहिले संजीवन संपले, देवाने दुसरे उभे केले आणी अधिक प्रकाश दिला; तशाचप्रकारे पुढे चालत राहिले.

83 आता आपण ह्या समयाच्या अंतात आहोत. प्रत्येक मनुष्याने त्याच्या जंक्शनकडे ख्रिस्ताच्या आगमनासाठी पाहिले आहे; परंतु त्यांच्याकडे पाहण्याकरिता पुढे पुष्कळ होते; यहुदी लोकांचे परतणे, आकाशामध्ये उडत्या तबकड्या, सर्व गोष्टी ज्या आज आपण पहात आहोत. परंतु आपण अंतिम समयात आहोत. आपण आता येथे आहोत. त्यांना ठाऊक आहे की मंडळीला सामर्थ्य प्राप्त होणार आहे जे मंडळीत कार्य करणार आहे ख्रिस्ताची तीच कृत्ये, कारण छाया जशी सखोल आणि सखोल होत जाते, आणि अधिक परावर्तीत करते.

84 तुम्ही एक सावली घ्या. त्या सावलीपासून जितके दूर जाऊ, तुम्हाला सावलीचे प्रतिबिंब कमी मिळत जाते. थोडा वेळाने, सावली जवळ आणि जवळ येत जाते, जोपर्यंत झाड आणि सावली एक होऊन जातात.

85 आता, देवाच्या आत्म्याने नीतीमत्वाखाली, लुथरखाली, पवित्रीकरणाद्वारे वेस्लीद्वारे, पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा पेंटेकॉस्टखाली कार्य केले आहे. आणि येथे तो अंतिम दिवसात, त्याच गोष्टी करीत आहे ज्या त्याने केल्या जेव्हा तो ख्रिस्तामध्ये होता. ते काय आहे? मंडळी आणि ख्रिस्त एक झाले आहेत.

आणि जसे ते एकत्र जोडले जातात, तो अंतिम दुवा, ती आकाशात, जयघोष करीत घेतली जाईल. वर वेस्ली, लुथर, आणि इतर सर्व त्या मागील दिवसातील तेथे येतील, “तो जो पहिला तो शेवटला होईल, तो जो शेवटला तो पहिला होईल,” आणि तेथे पुनरुत्थान होईल.

86 आपण अंतिम समयात आहोत. लक्षपूर्वक ऐका, तेच पवित्र आत्मा करतो. पवित्र आत्मा, नीतिमत्वाद्वारे, पाहा, त्याची एक फिक्कट सावली; पवित्र आत्मा पवित्रीकरणाद्वारे, थोडी गडद सावली, पवित्र आत्मा त्याच्या बाप्तिस्माद्वारे, एक गडद सावली; आता तो पवित्र आत्मा, प्रत्यक्ष त्या व्यक्तीच्या पुनर्स्थापनेद्वारे, चिन्हे आणि चमत्कार करताना जसे त्याने सुरुवातीला केले. होय! गौरव! मला “पवित्र देवविषयक वेडे” कसेही असो, तुम्ही आता सुरुवात करायला हवी.

87 भावांनो, लक्षपूर्वक ऐका, हे लक्षपूर्वक ऐका.

*...सर्व मेजे वांतीने भरली आहेत...निर्मळ जागाच उरली नाही.*

*तो कोणाला ज्ञान शिकवितो?...कोणाला संदेश समजावून सांगतो? दुध तुटलेल्यांस काय? थानतुट्या बालकांस काय?*

लहान बालके नाही. प्रेसबेटेरियन मुले, मेथडिस्ट मुले, पेंटेकॉस्टल बालके, लुथरन बालके, नाजरीन बालके. त्याला हवेत ज्यांचे दूध तुटलेले आहे आणि जड मांस खाऊ शकतात. येथे ते येते:

*कारण नियमांवर नियम…नियमांवर नियम; कानूवर कानून. कानूवर कानू; थोडे येथे, थोडे तेथे, असे तो बोलत असतो.*

*तोतऱ्यांच्या द्वारे परभाषेत तो लोकांशी बोलेल.*

*तो त्यास म्हणाला होता, ही विश्रांती आहे; भागलेल्यांस विसावा द्या; याने त्यास आराम होईल, तरी ते ऐकेनात.*

88 पवित्र आत्मा, जर तो तसा नव्हता ज्या प्रकारे तो पेंटेकॉस्टच्या दिवशी आला, तो येण्याच्या सातशे बारा वर्षे अगोदर भविष्यवाणी करण्यात आली होती! येथे पेंटेकॉस्टच्या दिवशी, तो अगदी तसाच आला.

89 कोणीतरी म्हणाले, "शब्बाथ दिवस पाळणे." मी कोणाची मंडळी किंवा धर्म नाकारीत नाही किंवा पुढे करीत काही. परंतु म्हणतो, "शब्बाथ दिवस, देवाचा शब्बाथ दिवस हा विसाव्याचा दिवस होता."

*येथे* तो विसाव्याचा दिवस आहे. [भाऊ ब्रॅन्हम त्याचे बायबल उचलून वर घेतात—सम्पा.] "हा विसावा आहे," त्याने म्हटले, "भागलेल्यांस विसाव्या द्या." हे ते आहे. आमेन! "ते नियमांवर नियम, कानूवर कानू होईल." येथे विश्रांती आहे. पवित्र आत्मा काय आहे? विसावा होय!

*अहो कष्टी आणि भाराक्रांत जनहो तुम्ही सर्व मजकडे या म्हणजे मी तुम्हाला विसावा देईन.*

90 तो काय आहे? तो एक जो तुमच्यामध्ये आला आहे, तुम्हास शांती देवो. तुमचे चिन्ह तुमचा कैवारी, कैवार घेतला आहे, विसाव्यात मुद्रीत केले आहे.

91 तुम्ही कसे आहात…? ते एक चिन्ह आहे; जगाला माहीत आहे की तुम्हाला काहीतरी झाले आहे. तो काय आहे? तो कैवारी आहे. तो काय आहे? एक शिक्का. तुम्ही विसाव्यात आहात. तुमच्याकडे…तो तुमचा वकील आहे. जर तुम्ही, जर तुम्हाला काही झाले, तेथे कोणी आहे. त्वरीत तुमचा कैवार घेण्यासाठी, पाहा, मध्यस्थी करीत आहे. तो देवाचा आत्मा आहे जो मंडळीमध्ये राहत आहे तो कसा असेल जेव्हा तो येईल ह्याविषयी तंतोतंत भविष्यवाणी करीत आहे. तो सार्वकालिक, अनंत विसावा असेल.

92 देवाने जग उत्पन्न केले. इब्रीकरांस पत्र, 4था अध्याय, "देवाने जग निर्माण केले, आणि सातव्या दिवशी विसावा घेतला." ते बरोबर आहे.

आठवा दिवस पुन्हा आला, खाली…त्याने तो यहुद्यांना करारासाठी, विशिष्ट समयासाठी दिला. ते बरोबर आहे. परंतु ते जातात आणि एक दिवस विश्रांती घेतात, मागे जातात, आठवड्याच्या पहिल्या दिवसाकडे, पुन्हा सुरुवात करतात; नव्याने, सुरुवात करतात. त्यांना तो विसावा मिळू शकत नाही ज्याविषयी देव बोलला.

जेव्हा देवाने हे जग सहा दिवसात बनवले, जेव्हा तो विसावा घेण्यास गेला, त्याने तेव्हापासून विसावा घेतला. ते बरोबर आहे. तेथे पूर्ण झाले. तो आठव्या दिवशी परत आला नाही आणि पुन्हा सुरुवात केली नाही.

93 ती फक्त एक छाया होती. आता, ते एक दर्शक होते, जसे चंद्राची सूर्याशी; परंतु जेव्हा सूर्य वर येतो, आपल्याला चंद्राची गरज भासत नाही. आता ह्याकडे लक्ष द्या, प्रकटीकरण 12 मध्ये, "एक स्त्री दिसली, ती सुर्यतेज पांघरलेली होती आणि तिच्या पायाखाली चंद्र," होय, आपण बायबलमधून जाऊ शकतो. एका झाकणामधून दुसऱ्या झाकणाकडे, आणि तुम्हाला दाखवतो. समजले?

94 परंतु ते काय आहे? केव्हा, बायबल इब्रीकरांस पत्र 4था अध्यायात, "जर येशूने त्यांना विसाव्याचा दिवस दिला असता, तो त्याविषयी नंतर बोलला असता; तो विसाव्याच्या दिवसाविषयी बोलला असता." कोणत्या दिवशी, तो विसाव्याविषयी बोलला?

*अहो कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व मजकडे या म्हणजे मी तुम्हाला विसावा देईन.*

95 मत्तय 11 वा अध्याय, 22 वे वचन...पाहा, मग, आम्हाला समजते जेव्हा आम्ही त्याच्याकडे जातो. "कारण जो," इब्रीकरांस पत्र 4 म्हणते, "कोणी येशूच्या विसाव्यात आला आहे त्यानेही जसा देवाने आपल्या कृत्यांपासून विसावा घेतला आहे," जेव्हा त्याने जग निर्माण केले, पुन्हा त्याकडे कधीही परत जाऊ नये. किती वेळ? [भाऊ ब्रॅन्हम मंचावर तीन वेळा ठोठावतात—सम्पा.] कधीपर्यंत तुम्ही पवित्र आत्म्याद्वारे मुद्रीत केले आहात? "तुमच्या मुक्तीच्या दिवसापर्यंत." तेथे तो विसावा, सांत्वन, समर्थक, शिक्का, मुक्तीदाता आहे. ओह! [भाऊ ब्रॅन्हम त्याचे हात एकत्र एकदा वाजवतात.] मी एक प्रकारे उत्साहीत झालो आहे, किंवा मी एक प्रकारे आशीर्वादीत झालो आहे. होय!

96 "काय त्याचे आपल्याला अभिवचन देण्यात आले आहे, भाऊ ब्रॅन्हम? काय ते बायबलद्वारे सिध्द केलेले आहे?"

ठीक आहे, आपण योएलकडे जाऊया, पाहूया योएल संदेष्ट्याद्वारे ह्याविषयी काय सांगितले आहे.

देवाच्या आशीर्वादीत वचनाबद्दल मी किती आभारी आहे! काय तुम्ही त्यावर प्रेम करता? [मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा.] मला वाटते, जर ते वचनाकरिता नसते, मला ठाऊक नाही आपण कोठे उभे असतो. ठीक आहे.

आपण आता योएलमध्ये आहोत. आपण योएल पुस्तकाकडे जात आहोत, योएलचा 2 रा अध्याय, आणि आपण 28 व्या वचनापासून सुरुवात करणार आहोत. योएल 2:28, ख्रिस्ताच्या आगमनाच्या आठशे वर्षे अगोदर, संदेष्टा आत्म्यामध्ये. आता लक्षपूर्वक ऐका.

*आणि यानंतर असे होईल की मी मनुष्यमात्रावर आपल्या आत्म्याचा वर्षाव करीन...तेव्हा तुमचे पुत्र व तुमच्या कन्या संदेश देतील, तुमच्या वृध्दास स्वप्ने पडतील, तुमच्या तरुणांस दृष्टांत होतील.*

*आणि तुमचे दास व दासी यांवरही त्या समयी...मी आपल्या आत्म्याचा वर्षाव करीन.*

*आणि मी आकाशात व पृथ्वीवर रक्त अग्नी व धुराचे लोळ अशी चिन्हे दाखवीन.*

*परमेश्वराचा महान व भयंकर दिवस येण्यापूर्वी...सूर्य अंधकारमय व चंद्र रक्तमय होईल.*

*तेव्हा असे होईल, की जो कोणी परमेश्वराचा धावा करील तो तरेल.*

97 ते एक...होय! काय? योएल! काय तुम्ही पाहीले? प्रेषितांची कृत्ये 2, पेत्राने तीच वचने उचलली. म्हटले, "अहो, यहुदी लोकांनो, माझे बोलणे ऐकून घ्या. तुम्हाला वाटते हे मस्त झाले आहेत, पण तसे नाही," हे मुद्रीत, सांत्वन पावलेले, विशेष, चिन्हांकीत केलेले लोक. "तुम्हाला वाटते हे मस्त झालेले आहेत, पण तसे नाही," प्रेषित कृत्ये 2, "कारण हा दिवसाचा पहिला प्रहर आहे. परंतु हे ते आहे जे योएल संदेष्ट्याद्वारे बोलले

गेले, म्हटले, 'शेवटल्या दिवसांत असे होईल की मी मनुष्यमात्रावर आपल्या आत्म्याचा वर्षाव करीन.'"

98 ते काय आहे, तो पवित्र आत्मा काय आहे? ठीक आहे, आता आपण पुन्हा पाहूया, विश्वासणाऱ्यांना अभिवचन दिले आहे, तेच ते आहे. आता हा पवित्र आत्मा, आपण पाहतो की तो काय आहे, फक्त एक मिनीट. कोणाला त्याचे अभिवचन दिले आहे? विश्वासणाऱ्यांना

आता आपण लूककडे जाऊया, लूकचा 24 वा अध्याय, लक्षपूर्वक ऐका येशूने काय म्हटले आहे त्याच्या अंतिम शब्दांत हे जग सोडून जाण्याआधी. लूकचा 24 वा अध्याय. आणि तुम्ही जे ह्याची टिप्पणी करीत आहा, तुम्ही नोंद करु शकता, मग उद्या त्याचा अभ्यास करा जेव्हा तुमच्याकडे अधिक वेळ असेल. आता, लूक 24 :49, येशूच्या बोलण्याकडे लक्षपूर्वक कान द्या. शेवटी, जेव्हा तो गौरवात उचलला गेला, स्वर्गारोहण, येथे ते शब्द आहेत जे त्याने त्याच्या शिष्यांना म्हटले.

*...पाहा, माझ्या पित्याने देऊ केलेली देणगी मी तुम्हाकडे पाठवितो...*

कोणते अभिवचन? तो शिक्का, चिन्ह, कैवारी, आणि ह्या सर्व गोष्टी ज्या मी हजारोहून अधिक वेळा बोललो आहे.

*...माझ्या पित्याने देऊ केलेली देणगी मी तुम्हाकडे पाठवतो.*

काय अभिवचन? "ते एक जे यशयाने म्हटले होते की येईल, 'तोतऱ्यांच्याद्वारे परभाषेत तो ह्या लोकांशी बोलेल.' मी तुम्हावर तो विसावा पाठवीन. मी ते पाठवीन जे योएल बोलला आहे, की 'देव म्हणतो, शेवटल्या दिवसात असे होईल की, मी माझ्या आत्म्याचा वर्षाव, तुम्हावर करीन.' मी तुम्हाकडे पाठवीन, आणि सर्व राष्ट्रे, सर्व लोक, यरुशलेमेपासून सुरुवात करुन...मी अब्राहामाचे संतान ह्या कराराखाली आणीन. मी त्यांतील प्रत्येक जणावर शिक्का मारीन. पहा, मी माझ्या आत्म्याचा वर्षाव करीन."

*...माझ्या पित्याने देऊ केलेली देणगी. मी तुम्हाकडे पाठवतो. तुम्ही स्वर्गीय सामर्थ्याने युक्त व्हाल, तोपर्यंत ह्या शहरात राहा.*

99 तर मग पवित्र आत्मा काय आहे? "स्वर्गीय सामर्थ्य," सामर्थ्य कोणा बिशपकडून नाही, कोणा मंडळीकडून नाही. परंतु, "स्वर्गीय सामर्थ्य."

100 ते सामर्थ्य कसे येईल? "मंडळीत सहभागी झाल्याने?" मी तुम्हाला आव्हान देतो ते करण्यास, म्हणा ते बरोबर आहे, "एका मंडळीत सहभागी होण्याद्वारे, प्रचारकाबरोबर हस्तांदोलन, करण्याने?" नाही, श्रीमान. आता, तुम्हा कॅथलिक लोकांस, "तुमची जीभ बाहेर काढण्याद्वारे आणि पहिला, ख्रिस्तप्रसाद घेतल्या द्वारे."? नाही, महाशय.

101 ते स्वर्गीय सामर्थ्य, कसे आले? थोडे आणखी पुढे वाचूया. प्रेषितांची कृत्ये 1:8 कडे जाऊया. ते आता एकत्र करुया. आता ते येथे येशूविषयी बोलत होते, तेव्हा ते एकत्र झाले होते, आणि यहुदाच्या जागी दुसऱ्याला नियुक्त केले होते. प्रेषितांची कृत्ये 1:8.

*परंतु पवित्र आत्मा तुम्हावर येईल तेव्हा तुम्हाला सामर्थ्य प्राप्त होईल...*

काय? "तुम्ही ब्रॅन्हम आराधनालयाचे सदस्य झाल्यावर"? नाही. "तुम्ही मेथडिस्ट मंडळीचे, कॅथलिक मंडळीचे, प्रेसबेटेरियनचे सदस्य झाल्यावर"? बायबलमध्ये, तसे नाही. ती मनुष्याने बनवलेली शिकवण आहे.

"परंतु तुला सामर्थ्य प्राप्त होईल तुम्ही एक प्रचारक बनल्यावर"? नाही, महाशय. "तुम्हाला सामर्थ्य प्राप्त होईल तुम्ही आर्टसची पदवी संपादन केल्यावर"? नाही, महाशय.

"तुम्हाला सामर्थ्य...प्राप्त होईल तुम्ही तुमची डीडी मिळाल्यावर"? नाही महाशय. "तुम्ही पाण्यामध्ये बाप्तिस्मा घेतल्यावर तुम्हाला सामर्थ्य प्राप्त होईल"? नाही, महाशय. "तुम्ही पहिला ख्रिस्तप्रसाद घेतल्यावर तुम्हाला पवित्र आत्मा प्राप्त होईल"? नाही, महाशय. समजले, त्या सर्व मनुष्याने बनवलेल्या गोष्टी आहेत.

102 बायबल काय सांगते ह्याकडे लक्षपूर्वक ऐका, येशूने काय म्हटले.

> *...परंतु पवित्र आत्मा तुम्हावर येईल तेव्हा तुम्हाला सामर्थ्य प्राप्त होईल.* (पवित्र आत्मा काय आहे? सामर्थ्य) *मग, ह्या नंतर, तुम्ही माझे साक्षी व्हाल...* (तुम्ही बारा लोक माझे साक्षी व्हाल)*...तुम्ही माझे साक्षी व्हाल यरुशलेमेत...यहुदीयांत...शोमरोनात, आणि पृथ्वीच्या शेवटापर्यंत.* (जे अजूनपर्यंत पोहचलेले नाही.)

> *आणि असे सांगितल्यावर त्यांच्या देखत तो वर घेतला गेला; आणि मेघाने त्याला...त्यांच्या दृष्टीआड केले.*

103 आता ह्या पानाच्या पलिकडे वळा, पाहा त्या भविष्यवाण्या पूर्ण झाल्या.

> *आणि नंतर पेंटेकॉस्ट म्हणजे पन्नासावा दिवस आला, तेव्हा ते एकत्र जमले...ते सर्व एकत्र एका ठिकाणी जमले असताना.*

"आणि अकस्मात पाळक आत आले आणि..."? मी विषयापासून दूर गेलो, मी गेलो की नाही? "अकस्मात पाद्री वेदीवर आला"? नाही

> *आणि अकस्मात तेथे, एक नाद...*

केवळ ठोंग नाही, तेथे एक नाद.

"एक सेवक दरवाजाजवळ येत होता"? "एका याजकाची देवाशी सहभागिता झाली, पवित्र स्थानातून बाहेर येत आहे"? नाही, तसे काहीच नाही.

> *...तेथे आकाशातून नाद झाला...*(पाय घसरण्याने नव्हे) *...तेथे आकाशातून नाद झाला जसा...मोठा वाऱ्याच्या सुसाट्यासारखा* (ओह, माझ्या देवा! होय! ...?...) *...आणि ज्या घरात ते बसले होते ते सर्व त्याने भरले.*

104 पवित्र आत्मा काय आहे? येथेच जेथे त्यांना सामर्थ्य मिळते. येथेच जेथे ते थांबायला हवे होते; येथे काय झाले जेव्हा त्यांनी ते केले. सर्व केलेल्या भविष्यवाण्या, उत्पत्तीपासून वर पर्यंत, अब्राहामाद्वारे, त्या येतील, आणि त्या कशा येतील, आणि ते परिणाम प्रगट होतील. ते काय आहे? मंडळीला, विश्वासणाऱ्यांना अभिवचन दिले.

> *...आणि ज्या घरात ते बसले होते ते सर्व त्याने भरले.*

> *आणि वेगवेगळ्या होत असलेल्या अग्नीच्या जिभांसारख्या जिभा त्यांना दिसल्या व प्रत्येकावर त्या एक—एक अशा बसल्या.*

> *तेव्हा ते सर्वजण पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाले आणि आत्म्याने जसजशी त्यांना वाचा दिली तसतसे ते निरनिराळ्या भाषांतून बोलू लागले.*

आता आपण त्यावर, शुक्रवारी रात्री पाहणार आहोत. आपण ते त्यासाठी सोडूया, समजले.

105 ते कसे आहे? ते मंडळीसाठी एक अभिवचन आहे, संपूर्णतः एक अभिवचन आहे. ठिक आहे.

106 आता, आता आपण हे पाहूया, ते भरले गेल्यानंतर, त्यांना कधीपर्यंत मुद्रीत करण्यात आले होते? [मंडळी म्हणते, "मूक्तीच्या दिवसापर्यंत."—सम्पा.]

येथे कितीजण आहेत त्यांना पवित्र आत्मा मिळाला आहे? तुमचे हात पाहू दया. तेथे पवित्र आत्म्यासह अधिक आहेत आत्मा नसलेल्यापेक्षा. आमची इच्छा आहे की तुम्ही आमच्यातील एक असावे, भावा, बहिणी. जेव्हा तुम्हाला तो काय आहे हे कळेल, तो... तो देवाचा आत्मा आहे जो तुम्हामध्ये वस्ती करतो, देवाची कार्ये करण्याकरिता.

जेव्हा देवाने त्याचा कोणताही आत्मा कोणाही त्याच्या सेवकांवर, त्याच्या संदेष्ट्यांवर, त्याच्या कोणा शिक्षकांवर, त्याच्या प्रेषितांवर पाठवला, ते नेहमीच जगाद्वारे नाकारले गेले, प्रत्येक युगात त्यांना वेडे गणले गेले. अगदी जेव्हा पौल अग्रीपापुढे उभा राहिला, त्याने म्हटले, "त्यांच्या वादाविषयक बाबी ह्यात आपण विशेष जाणते आहा..." *पाखंडीमत* काय आहे? "वेडा." "ज्याप्रकारे ते वेडे म्हणतात, वेड्यांचा समुह, तशाचप्रकारे मी आपल्या वडिलांच्या देवाची आराधना करतो." [भाऊ ब्रॅन्हम त्यांचे हात एकदा एकत्र वाजवतात.—सम्पा.] मी इतका आनंदी आहे की मी त्यांच्यातील एक आहे. होय, महाशय. ते बरोबर आहे. मी इतका आनंदी आहे मी म्हणू शकतो मी त्यांच्यातील एक आहे.

107 आता, हा पवित्र आत्मा त्यांच्यावर आल्यानंतर. त्याने त्यांना इतके प्रेमळ अंतःकरणाचे केले की त्यांचे सर्वकाही समाईक होते. ते बरोबर आहे का? माझ्या, माझ्या देवा, काय सहभागिता आहे! आपण ते गाणे कधीतरी गातो. "ओह, काय सहभागिता! ओह, काय दैवी आनंद!" तेच ते आहे. ते पर्वा करीत नाही, ते पर्वा करीत नाही की सूर्य चमकणार की नाही, ते सुखसोयीच्या फूलाच्या बिछान्याची मागणी करीत नाही.

"आता, मी पवित्र आत्म्याचा स्विकार करतो," असे काही लोकं मला म्हणतात, "श्री. ब्रॅन्हम, जर तू मला हमी देशील की मी लाखोपती होईन, जर तू मला हमी देशील की मला तेलाच्या विहीरी सापडतील. आणि जर मला सोन्याची खाण सापडेल, आणि मी—मी..." पाहा, लोक ते शिकवतात, आणि ते खोटे शिकवतात, देवाने त्या गोष्टींचे अभिवचन दिले नाही.

108 एक मनुष्य ज्याला पवित्र आत्मा मिळतो तो पर्वा करीत नाही की त्याला भाकरीकरिता भीक मागावी लागेल, किंवा नाही. त्याने त्याला काही फरक पडत नाही. तो एक स्वर्गाशी–बांधलेला जीव आहे. त्याला नाही...त्याचा इथे काही संबंध नाही, बिलकुल ते बरोबर आहे. तो पर्वा करीत नाही. येऊ दे, जाऊ दे, जे काही. त्यांना टिका करु दे, मजा करु दे. तुमची प्रतिष्ठा कमी होते, तुम्ही कशाची पर्वा करता? तुम्ही तुमच्या गौरवाच्या मार्गावर उभे आहात! हालेलुयाह! तुमचे डोळे ख्रिस्तावर लागले आहेत, तुम्ही तुमच्या मार्गावर आहात. तुम्ही जग काय सांगते ह्याची पर्वा करीत नाही.

तोच पवित्र आत्मा आहे. तो सामर्थ्य आहे, तो एक शिक्का आहे, तो एक कैवारी आहे, तो एक वकील आहे, तो एक चिन्ह आहे. ओह, माझ्या देवा, तो एक खात्री आहे की देवाने तुझा स्विकार केला आहे.

मी किती वेळ घेतला आहे? माझ्याकडे आणखी आठ मिनिटे आहेत. ठीक आहे. मला...माझ्याकडे येथे खूप वचने आहेत. मला वाटत नाही मी त्यांना घेऊ शकतो, परंतु आपण—आपण आपल्या परीने प्रयत्न करु.

109 आता, एकदा मनुष्य पवित्र आत्म्याने भरल्यावर हे शक्य आहे की छळणूक आणि अशा गोष्टी त्याला मागे वळण्यास लावतील आणि...आता, त्याचे काही नुकसान होणार नाही, तो अजुनही परमेश्वराचा पुत्र आहे, तो नेहमीच असेल, कारण तुम्हाला कधीपर्यंत

मुद्रीत केले आहे? [मंडळी म्हणते, “मुक्तीच्या दिवसापर्यंत.”—सम्पा.] ते खरे आहे. तेच बायबल सांगते.

110 आता, शिष्यांना मारझोड करण्यात आल्यानंतर त्यांना चिडविण्यात आले, त्यांची थट्टा करण्यात आली, आणि सर्वगोष्टी, त्यांनी विचार केला की हा समय आहे थोडावेळ एकत्र परत जाण्याचा. आपण वळूया—वळूया प्रेषितांची कृत्ये 4 था अध्याय, आणि पाहूया केव्हा ते...काय घडले. आता हे तुम्हा लोकांसाठी आहे ज्यांच्याकडे तो अगोदरच आहे. प्रेषितांची कृत्ये 4 था अध्याय.

आता, पेत्र आणि योहान ह्यांना मारण्यात आले, तुरुंगात ठेवण्यात आले, बरे केल्यामुळे, मंदिराच्याजवळ चंगाईसभा घेतल्यामुळे किती जणांना हे माहीत आहे? तेथे एक मनुष्य पडलेला होता, पायाने लंगडा होता. तो चालू शकत नव्हता. तो तशा स्थितीत चाळीस वर्षांपासून होता. आणि पेत्र तेथून जात होता. आणि त्याने म्हटले...त्याचे भांडे पुढे केले, त्याच्याकडून त्याच्या भांड्यात काहीतरी मिळेल म्हणून, अन्नाकरिता.

आणि पेत्राने त्याला सांगितले की तो पवित्र आत्म्याने भरलेला प्रचारक आहे, त्याच्याकडे काही पैसे नाहीत. त्याने म्हटले—त्याने म्हटले, “माझ्या जवळ सोनेरुपे काही नाही.” पाहा, त्याला त्याची पर्वा नव्हती. परंतु तो स्वर्गाशी बांधलेला जीव होता. ओह, मला किती वाटते आपल्याकडे समय असता की त्यांत आणखी थोडा वेळ राहिलो असतो, समजले. तो स्वर्गाशी–बांधलेला होता. तो सांत्वन पावलेला होता. त्याच्याकडे तो आत्मा होता. त्याच्याकडे सामर्थ्य होते तो गेला आणि म्हणाला, “माझ्याकडे सोनेरुपे काही नाही. पण जे आहे ते तुला देतो.”

निसंशय तो मनुष्य म्हणाला, “तुझ्याकडे काय आहे, महाशय?”

“माझ्याकडे विश्‍वास आहे.” माझ्याकडे माझ्या अंत:करणात असे काही आहे ज्याची सुरुवात सुमारे दहा दिवसांअगोदर झाली. मी माडीवरील खोलीत होतो, आणि अकस्मात सर्व अभिवचने जी देवाने केली होती...मी येशू ख्रिस्ताबरोबर साडेतीन वर्षांपासून चालत होतो. मी त्याच्यासह मासेमारी केली, मासे ओढीत होतो. मी ह्या निरनिराळ्या गोष्टी केल्या. आणि मी त्याला आजाऱ्यांना बरे करताना पाहिले. मी...तो मला सांगत असे. ‘पिता माझ्यामध्ये आहे; परंतु जेव्हा मी जाईन, तो तुम्हामध्ये येईल’. तरी, मी ते समजू शकलो नाही. परंतु त्याने म्हटले, ‘आता, तुला हे समजावे अशी माझी अपेक्षा नाही.’”

तुम्हाला ह्या गोष्टी समजणार नाही; तुम्ही फक्त त्या घ्या. मला अजूनही त्या समजत नाही. आणि मला सांगू नको तू कर; कारण, तुम्ही करणार नाही. समजले? कारण, मी ते समजू शकत नाही, मी ते समजावू शकत नाही, परंतु, फक्त एक गोष्ट मला माहीत आहे, माझ्याकडे तो आहे.

“बरे, बरे,” तुम्ही म्हणता, “ते शास्त्रोक्त पद्धतीने नाही.” होय, निश्‍चितच ते आहे.

111 त्या उजेडाकडे पाहा, जेव्हा बेन्जामीन फ्रँकलीनला तो मिळाला, त्याने म्हटले, “माझ्याकडे तो आहे.” त्याला ठाऊक नाही की त्याच्याकडे आहे, परंतु त्याच्याकडे तो आहे, आणि मला कोणीतरी पाहिजे की ह्या रात्री मला सांगेल की विद्युत शक्ती काय आहे. त्यांना अजून माहीत नाही की ती काय आहे, परंतु आपल्याकडे ती आहे. आमेन. ते बरोबर आहे. तेथे कोणीही मनुष्य नाही जो जाणतो विद्युतशक्ती काय आहे. ते तिला कामाला लावू शकता, प्रकाश देण्यास लावू शकतात, तिला कृती करण्यास लावू शकतात. परंतु ती—ती वीज उत्पन्न करणाऱ्या यंत्रांद्वारे उत्पन्न केली जाते, दोन तुकडे *तशा* प्रकारे एकत्र वाहतात. ते ती उत्पन्न करतात. आणि तेच सर्वांना माहीत आहे. ती प्रकाश देईल, आणि तिच्यामध्ये सामर्थ्य आहे.

112 आणि ते देवाच्या आत्म्यासारखे आहे. जेव्हा तुम्हाला एक तुकडा मिळतो, तुम्ही आहात, आणि दुसरा तुकडा देव आहे; आणि ते एकत्र *तशा* प्रकारे वाहतात, ते तुमच्यासाठी काहीतरी करतात. ते खरे आहे. ते प्रकाश देईल. ते सामर्थ्य देईल. तुम्हाला ठाऊक नाही ते काय आहे, आणि कधीच कळणार नाही की ते काय हे, परंतु तुम्हाला ते कळेल जेव्हा तो तुम्हाला मिळेल. ही एक गोष्ट निश्चित आहे. आणि ती तुमच्यासाठी आहे. ती तुमची आहे. ती खात्री आहे. ते खरे आहे.

*तो* प्रकाश काय दर्शवितो? तेथे आश्वासन आहे. तो प्रकाश आहे.

आता ह्याकडे लक्ष द्या. आता, तुम्ही जाणत नाही की ते काय आहे.

113 परंतु हे लोक म्हणतात, "बरे," ते...ते म्हणतात एक गोष्ट त्यांना माहीत आहे, "आम्हाला माहीत आहे की ते अज्ञानी आहेत." आणखी काही "वेडे," तुम्हाला ठाऊक आहे, जसे तो लहान जर्मन म्हणाला होता. समजले? म्हणाले, "ते अज्ञानी आणि अशिक्षित आहेत. परंतु ते त्या मच्छीमारासह होते, तो सुतार जो खाली पलिकडे होता, ज्यास येशू म्हणतात, मी तुम्हाला सांगेन, कारण ते त्याच गोष्टी करीत आहे ज्या त्याने केल्या."

114 तोच पवित्र आत्मा आहे, येशू त्या अज्ञानी मच्छीमारात, एका सुतारात, किंवा कोणाही असो, अज्ञानी प्रचारक, तो काहीही असो, राहात आहे. तो एक मनुष्य आहे ज्याची इच्छा आहे की जगाच्या गोष्टींविषयी अज्ञानी असावे, आणि येशूला त्याच्यामध्ये येऊ द्यावे, देवाचा आत्मा तो शिक्का, तो कैवारी. तो प्रतिष्ठेविषयी पर्वा करीत नाही; फक्त त्याला एक गोष्ट पाहीजे ती म्हणजे देव.

115 जेव्हा देव व्यवस्था लावीत होता, त्याने म्हटले, "तुम्ही सर्व लेवी वंशज, मी तुम्हाला बाहेर बोलावले आहे आणि तुम्हाला याजक बनविले आहे. आणि तुमचे सर्व बंधुजन, इतर, बारा वंश आणि...इतर अकरा वंश तुम्हाला दशमांश देतील."

"जेव्हा, तुम्हाला नऊ बुशल सफरचंद मिळतील, एक बुशल लेव्यांसाठी ओता. जेव्हा तुम्ही तुमच्या मेंढ्या येथून न्याल, दहावी मेंढी त्यांना द्या. मी त्याची पर्वा करीत नाही की ती एक लहानशी आहे किंवा मोठी, किंवा धष्टपुष्ट किंवा दुर्बळ आहे, ती लेव्यांची आहे."

"आता, लेव्यांनो, जेव्हा तुम्हाला हे सर्व मिळेल, तेव्हा तुम्हीही त्याचा दशमांश, प्रभूसाठी काढा. तुम्ही वेगवेगळी अर्पणे. तुम्ही दशमांश प्रभूला द्या."

116 म्हणाला, "मोशे, तुझा वाटा, मी तुझा वाटा आहे." अरे, माझ्या देवा! त्याने म्हटले, "मी तुझा वतनाचा वाटा आहे."

आणि तसाच पवित्र आत्मा मंडळीसाठी आज आहे. रुपे आणि सोने माझ्याकडे नाही. परंतु माझ्याकडे वतनाचा वाटा आहे. हालेलुयाह! शिक्षण, मी हे पुस्तक देखिल वाचू शकत नाही, परंतु माझ्याकडे वतनाचा वाटा आहे. ते चांगले आहे. डॉक्टरेट पदवी, माझ्याकडे नाही; पी.एच.डी. किंवा एल.डी, किंवा दुसरे काहीच नाही. परंतु तेथे एक गोष्ट माझ्याकडे आहे, वतनाचा वाटा. तोच भाग मला हवा आहे. देवाची इच्छा आहे की तो भाग तुम्हाला मिळावा. इतर ह्या जुन्या गोष्टी फेकून द्या, सर्व प्रतिष्ठा आणि इतर सर्वगोष्टी, आणि बाहेर या आणि देवाच्या वतनाचा वाटा मिळवा.

117 कारण, तुमच्याकडे ह्या पृथ्वीवर जे आहे, तुम्हाला येथेच सोडावे लागेल जेव्हा तुम्ही हे जग सोडून जाल. परंतु जर तुमच्याकडे तो वतनाचा वाटा असेल, तो तुम्हाला निश्चितच वर घेऊन जाईल. आपण नेहमीच वीमा काढतो, आज, कार्यवाहकाला देण्यासाठी. आपण

देवाच्या वतनाचा वाटा मिळवूया, आणि कार्यवाहक मिळवण्याऐवजी वर नेणारा मिळवूया. तुम्हाला ठाऊक आहे, ते दोघेही काम करतात.

118 आता आपण पाहूया.

*...ते सुटल्यानंतर, आपल्या मित्रमंडळीकडे गेले...*

परत याजकाकडे नाही. पाहिले, ते दाखवत होते की त्यांच्याकडे तो आहे. ते त्या जुन्या, थंड औपचारिक गोष्टीकडे पुन्हा गेले नाही. मागे जा आणि म्हणा, "आता येथे पाहा त्यांनी आपल्यासाठी काय केले!" नाही, नाही. त्यांचे स्वतःचे समुह होते. तेथे केवळ डझनभर होते, परंतु तो पुरेसा समुह होता, एक लहानसा मुठभर लोकांचा.

*...ते सुटल्यानंतर...*

नंतर त्यांनी त्यांना मारहाण केली आणि त्यांना धमकावले, म्हणाले, "जर तुम्ही पुन्हा येशूच्या नावाने बाप्तिस्मा दिला!" किंवा ओह, मला म्हणायचे आहे...बरे, ते बरोबर आहे. समजले? "जर तुम्ही पुन्हा येशूच्या नावाने प्रचार केला, तुम्ही जे काही कराल, आम्ही तुम्हाला कैद करु!"

119 म्हणाले, "होय, ती एक प्रकारची धमकी आहे. चला इतर बंधुजनांकडे जाऊया." होय, तोच मार्ग आहे. एकतेत सामर्थ्य आहे. एकतेत सामर्थ्य आहे. म्हणाले, "आपण इतर बंधुजनांकडे जाऊया आणि पाहुया आपण काय करु शकतो."

120 आता ते सर्व एकत्र आले आणि वेगवेगळे अनुभव सांगत होते.

*...ते सुटल्यानंतर, ते आपल्या मित्रमंडळीकडे गेले, आणि मुख्य याजक आणि वडील जे काही त्यांना म्हणाले होते ते सर्व त्यांनी सांगितले.*

*आणि हे ऐकून ते एकचित्ताने देवाला उच्च स्वराने म्हणाले...*

आता लक्षपूर्वक ऐका ते काय म्हणाले. त्याला पाहा, त्यांना पाहा, मागे फिरु नका आणि म्हणाला, "ओह..." काहीतरी दुसऱ्या विषयी, "हे प्रभू, मला क्षमा कर..." नाही. त्याचे तारण अगोदरच झाले होते. ते त्या आत्म्याने भरलेले होते. त्यांच्याकडे सार्वकालिक जीवन होते.

*...ते एकचित्ताने...देवाला उच्च स्वराने...म्हणाले, हे स्वामी, तू देव आहेस...*

आमेन! मला ते फार आवडले, भाऊ पामर! मला ते फार आवडले.

*...हे स्वामी,* (आम्हाला हे ठाऊक आहे) *आकाश, पृथ्वी, समुद्र ह्यांचा व त्यांच्यात जे काही आहे त्या सर्वांचा उत्पन्नकर्ता तूच आहेस.*

*आमचा पूर्वज, तुझा सेवक दाविद...म्हणाला...*

121 आता लक्ष द्या, तुम्ही परत येणार आहात, म्हणा, "आता, आम्ही नाही..." आता तुम्ही तेथे जा आणि म्हणा, "बरे, आता, प्रभू आता येथे एक मिनीट थांबा. ते माझी इतकी थट्टा करतात!" त्याने असे म्हटले नव्हते काय ते तसे करतील?

"सर्व जे येशू ख्रिस्तामध्ये सुभक्तीने जगतात त्यांचा पाठलाग होईल."

"बरे, तुम्हाला माहीत आहे, माझ्या मालकाने मला सांगितले जर त्याने पकडले..." ते असे म्हणत नाही का ते तसे म्हणतात? "बरे, तुम्हाला माहीत आहे, त्यांनी दुसऱ्या दिवशी मला कोर्टात त्याविषयी खेचले."

122 त्याने म्हटले नाही काय, “तुम्हाला राजे व अधिकारी, ह्यांच्यापुढे माझ्या नावासाठी नेतील. तेव्हा उत्तर कसे द्यावे ह्याविषयी आधीच विचार करावयाचा नाही असा मनाचा निर्धार करा, कारण बोलणारे तुम्ही नाही.”? मी ते घडताना काल पाहिले. “तो पवित्र आत्मा आहे जो तुम्हामध्ये वस्ती करतो; तो ते बोलेल.” पाहा. “तो,” ते बरोबर आहे. ठीक आहे. “तुम्ही काय बोलावे ह्याचा विचार करु नका.”

*प्रभू द्वारे...तुझा...तुझा सेवक दाविद, ह्याच्या मुखाने पवित्र आत्म्याच्याद्वारे तू म्हटले; राष्ट्रे का खवळली, आणि लोकांनी व्यर्थ योजना का केल्या?*

*प्रभूविरुध्द व त्याच्या अभिषिक्ताविरुध्द पृथ्वीचे राजे उभे राहिले व अधिकारी जमले*

*...कारण खरोखरच ज्याला तू अभिषेक केला तो तुझा पवित्र सेवक येशू ह्याच्याविरुध्द ह्या शहरात परराष्ट्रीय व इस्त्राएल लोक ह्याच्यासह हेरोद व पंतय पिलात हे एकत्र झाले.*

*ह्यासाठी की जे काही घडावे म्हणून तू स्वहस्ते व स्वसंकल्पाने पूर्व योजिले होते ते त्यांनी करावे.*

हे, माझ्या देवा! मला ते आवडते. “प्रभू, ते तीच गोष्ट करीत आहेत जी तू सांगितले की ते करतील.” बायबल काय सांगते? “शेवटल्या काळी, तेथे विश्वासघातकी, हूड, गर्वाने फुगलेली, देवावर प्रेम करण्याऐवजी सुख विलासाची आवड धरणारी; ममताहीन, शांतताद्वेषी, चहाडखोर, असंयमी, क्रूर, चांगल्याबद्दल प्रेम न बाळगणारी. सुभक्तीचे केवळ बाह्यरुप दाखवून तिचे सामर्थ्य नाकारणारी...” ते तेथे वर कधीच गेले नाही आणि सामर्थ्य मिळाले. “...त्यानंतर पवित्र आत्मा तुम्हावर आला आहे.” “सुभक्तीचे केवळ बाह्यरुप दाखवून, परंतु तिचे सामर्थ्य नाकारणारे. त्यांच्यापासून दूर राहा.” तोच पवित्र आत्मा आहे. कळले?

*...पूर्वी योजिलेले...*

*...तर हे प्रभो, आता तू त्यांच्या धमकावण्यांकडे पाहा; आणि—आणि बरे करण्याकरिता तू आपला हात लांब करीत असता आपल्या दासांनी पूर्ण धैर्याने तुझे वचन सांगावे असे कर.*

ओह, मला ते आवडेल! तो जुना विनोबोन बाहेर काढा, आणि तेथे खरा आधारस्तंभ मिळवा. आता येथे लक्ष द्या.

*...आम्ही तुझे वचन सांगावे,*

*बरे करण्याकरिता तू आपला हात लांब करीत असता;...*

हे, भावा! दुरात्मे मरत नाही, परंतु पवित्र आत्मा दोहोंपैकी एक नाही. समजले?

*...बरे करण्याकरिता तू आपला हात लांब करीत असता...तुझा पवित्र लेकरू येशू ह्याच्या नावाने चिन्हे व अद्भूत घडावी असेही कर.*

तुम्हाला माहीत आहे ते कशाविषयी बडबड करीत होते, तुम्हाला माहीत नाही का? ते आजही तीच गोष्ट करीत आहेत, परंतु ते जराही चांगले करीत नाही.

*आणि त्यांनी प्रार्थना केल्यावर, ज्या जागेत ते जमले होते ती हादरली, आणि ते सर्व पवित्र आत्म्याने परिपूर्ण होऊन, ...देवाचे वचन धैर्याने बोलू लागले.*

123 होय! माझ्या देवा! त्यांना काहीतरी मिळाले जेव्हा ते वर तेथे गेले, त्यांना नाही का? अभिवचन म्हणते की तोच पवित्र आत्मा आहे, तुम्हाला धैर्य देणे, तुम्हाला सांत्वन देणे, तुम्हाला शिक्षा देणे, तुम्हाला एक चिन्ह देणे. ओह, माझ्या देवा!

124 लक्षपूर्वक ऐका. ओह, वाटते आपल्याकडे थोडे अधिक समय असता, आपण फिलीप्पासह शोमरोनापर्यंत गेलो असतो. प्रेषितांची कृत्ये 8:14, तुम्ही सर्व त्याची टिप्पणी घेत आहात. त्यांना मोठा आनंद मिळाला होता, त्यांना मोठे आरोग्यदान मिळाले होते, परंतु त्यांचा बाप्तिस्मा येशू ख्रिस्ताच्या नावाने झाला होता. परंतू त्यांना यरुशलेमेत पेत्राकडे पाठविण्यात आले; तो खाली आला आणि त्यांच्यावर हात ठेवले, आणि त्यांना पवित्र आत्मा मिळाला. प्रेषितांची कृत्ये 8:14

125 परराष्ट्रीय, तेथे एक होता ज्याचे नाव कर्नेल्य होते. तो एक चांगला मनुष्य होता, दशमांश देत होता, लोकांसाठी सभास्थाने बांधली होती, देवाचा आदर करीत होता, देवाचे भय बाळगणारा होता, एक नीतिमान मनुष्य, चांगला प्रेसबेटेरियन, मेथडिस्ट, बाप्टिस्ट, किंवा दूसरा कोणी पाहा, एक खूप चांगला मनुष्य. परंतु एके दिवशी, देव म्हणाला, “तो एक नीतिमान मनुष्य आहे. म्हणून मी त्याला एका सभेत पाठवणार आहे. मी तेथे माझा प्रचारक पाठवणार आहे आणि त्याला त्याविषयी सांगणार आहे.” सर्व ठिक आहे,

म्हणून त्याने एक दृष्टांत पाहिला. म्हणाला, “यापोस जा, आणि तुला तेथे शिमोन नावाचा माणूस सापडेल, एक चांभार. आणि तेथे एक, शिमोन पेत्र, आहे. त्याला येथे वर येऊ दे; तो तुला मार्ग सांगेल, कारण त्याला काहीतरी मिळाले.”

126 आणि जेव्हा पेत्र तेथे उभा होता…आणि कर्नेल्य त्या प्रचारकाला नमन करण्यासाठी जात होता. तो होता. परंतु पेत्र म्हणाला, “उभे राहा. मीही तुझ्यासारखाच मनुष्य आहे.”

“आणि पेत्र हे शब्द बोलत असता,” ते कसे ते मागे, प्रारंभामध्ये गेले…त्याच गोष्टीविषयी मी बोलत आहे, कसे देवाने पवित्र आत्मा ओतण्याचे अभिवचन दिले आहे. “पेत्राचे हे भाषण चालू असतानाचा वचन ऐकणाऱ्या सर्वांवर पवित्र आत्मा उतरला.” होय! होय, तोच पवित्र आत्मा आहे, तो कोणा करिता आहे. निश्चित. “आणि ते सर्व पवित्र आत्म्याने भरले.”

127 आता इफिसमध्ये पाहतो, तेथे एक बाप्तिस्ट भाऊ होता. तो अगोदर एक वकील होता, चलाख, हुशार माणूस, शास्त्रपारंगत, थोर मनुष्य, विद्वान होता. एके दिवशी तो बायबल वाचीत होता, आणि त्याने पाहीले तेथे मसाहीच्या नावाने एक येणार आहे. आणि जेव्हा त्याने हे केले, का, त्याने येशूविषयी ऐकण्यास सुरुवात केली, आणि त्याने म्हटले, “माझी खात्री झाली आहे. आणि मी जाहीरपणे माझा विश्वास जाहीर करतो की येशू हाच ख्रिस्त आहे, देवाचा पुत्र आहे.” तो खरा बाप्टिस्ट होता. येथे तो सोबत येतो, “मी जाहीरपणे माझा विश्वास जाहीर करतो की येशू हाच ख्रिस्त आहे.” तो ते इतके करीत होता की देवाने त्याला सेवकाईमध्ये बोलावले. देव सदैव खऱ्या अंत:करणाशी बोलतो.

128 आणि तेथे एक राहुट्या बनविणारा होता ज्याचे नाव अक्विल्ला आणि प्रिस्कील्ला, एक पती आणि पत्नी. ते राहूट्या बनविणारे होते. प्रेषितांची कृत्ये 18 वा अध्याय, त्याविषयी तुम्हास सांगतो. पौल, ते त्याचे मित्र होते. त्यांना पौलाच्या हाताखाली आणि शिक्षणाखाली पवित्र आत्मा मिळाला होता.

त्यांनी ऐकले की तेथे संजीवन येणार होते, म्हणून ते तेथे गेले. तेथे केवळ दहा किंवा बाराजण उपस्थित होते. म्हणून तो तेथे ते पाहण्यासाठी गेला आणि त्याने ह्या प्रचारकाला, त्याच्या अंत:करणाच्या प्रामाणिकपणाने प्रचार करताना ऐकले. त्याने म्हटले, “तुम्हाला माहीत आहे, मी विश्वास करतो की तो सत्य ऐकेल.”

म्हणून सभा संपल्यावर, त्याने त्याला तंबूच्या मागे बोलावले, आणि म्हटले, “पाहा, आपल्याला एक लहानसा भाऊ जो इतका उंच, लहानश्या नाकाचा यहुदी आहे, आणि, परंतु जेव्हा तो येथे येईल, तो तुम्हाला देवाचे वचन शिकवील, स्पष्टपणे.” मग, काही वेळानंतर...

129 पौल त्यावेळी बंदीशाळेत होता. एका आधुनिकतावादी प्रचारकासाठी भीषण जागा, नाही का? परंतु तो बंदीशाळेत होता आणि प्रभूने त्याला तेथे नेले होते. म्हणून, भूमीकंप झाल्यावर, बंदीशाळेचे पाये डगमगले, त्याने बंदीशाळेचा नायक व त्याचे घराणे घेतले आणि त्यांना सर्वांना बाप्तिस्मा दिला, प्रभू येशूच्या नावाने, आणि पुन्हा आले.

आणि त्याने एका लहान मुलीमधून पिशाच्चाला घालवून दिले जी दैवप्रश्न सांगत होती. आणि मग, ते तिच्याद्वारे खूप पैसे कमवित होते, म्हणून त्याने त्यांचे जाळे उघड केले, म्हणून त्यांनी त्याला बंदिशाळेत टाकले. आणि प्रभूने बंदिशाळेचे पाये हादरवले, कारण तेथे सत्य ऐकणारा व त्याच्या लोकांचा समुह होता. तुम्ही देवाच्या वचनाला बेड्या घालू शकत नाही. तेथे...काहीही असो, तुम्ही करु शकत नाही. तुम्ही ते करु शकत नाही.

130 म्हणून तो तेथे आला जेथे हा मनुष्य होता. आणि अक्विल्ला आणि प्रिस्किल्ला कदाचित त्यांच्याकडे सँडवीच होते. आणि सँडवीच खाल्यानंतर लगेच ते म्हणाले, “आपण संजीवनाच्या सभेला जाऊ.”

पौल तेथे मागे बसला होता आणि त्याचा झगा पकडून होता, आणि बाप्तिस्ट प्रचारकाला प्रचार करताना ऐकत होता.

त्याने म्हटले, “ते चांगले आहे, जे तू प्रचार करतोस, परंतु तेथे त्यापेक्षा काही अधिक आहे.” म्हणाला, “डॉ. अपुल्लो, मला तुम्हाला एक प्रश्न विचारायचा आहे. तुम्ही विश्वास ठेवला तेव्हा तुम्हास पवित्र आत्मा मिळाला काय?”

“ओह,” त्याने म्हटले, “पवित्र आत्मा आहे, की काय हे आम्ही ऐकले नाही. ‘पवित्र आत्मा’ म्हणजे काय आहे? आम्ही बाप्तिस्ट आहोत.”

म्हटले, “तुम्हाला कसे कळले तुम्ही बाप्तिस्ट आहात?” पाहिले?

“बरे, आमचा बाप्तिस्मा झाला आहे. आम्हाला केवळ योहानाचा बाप्तिस्मा ठाऊक आहे.”

त्याने म्हटले, “तो पश्चातापाचा बाप्तिस्मा देत असे, तो लोकांना सांगत असे की, ‘माझ्यामागून येणाऱ्यावर म्हणजे’ येशूवर तुम्ही विश्वास ठेवावा.”

आणि जेव्हा त्याने हे ऐकले, त्यांना पुन्हा, येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्मा देण्यात आला. आणि पौलाने त्याचे हात त्यांच्यावर ठेवले. आणि त्यांच्यावर पवित्र आत्मा आला आणि ते वेगवेगळया भाषा बोलू लागले आणि ईश्वरी संदेश देऊ लागले. म्हणाले, “जो कोणी,” आता.

131 आता, आपण हे कसे करतो? मी तुम्हाला काही सांगू इच्छीतो, मग मी...आपण बंद करु, कारण, ते, मी तुम्हाला सांगितले आहे की मी तुम्हाला लवकर सोडेन. तुम्ही जाणता की पवित्र आत्मा काय आहे. ह्या रात्रीसाठी देवाचे वचन...माझ्याकडे तेथे दुसरा समुह आहे. परंतु, आपल्याला तो गाळावा लागेल. आपण पहिले करिंथ 12 कडे वळूया. आणि मग आपण हे वाचूया आणि मग आपण—आपण समाप्त करु. ठीक आहे. पहिले करिंथ, 12 वा अध्याय.

किती जण संत पौलाच्या शिकवणीवर विश्वास ठेवतात? [मंडळी म्हणते, “आमेन.”—सम्पा.] निश्चितच! त्याने म्हटले, गलतीकरांस पत्र 1:8, “जर स्वर्गातून

आलेल्या देवदूताने, निराळी सुवार्ता सांगितली, तरी तो शापभ्रष्ट असो," एकटा प्रचारक असो. "जर स्वर्गातून एक देवदूत खाली आला आणि निराळी सुवार्ता सांगितली, तर तो शापभ्रष्ट असो." पाहा, तुम्हाला त्याच्याशी काही कर्तव्य नाही.

132 आता हे पाहा, पहिले करिंथ 12, किती—किती जणांना माहीत आहे की आपल्याला ख्रिस्तामध्ये असले पाहीजे जर पुनरुत्थानामध्ये जायचे असेल, कारण ती त्याचे शरीर आहे जे देवाने उठविण्याचे अभिवचन दिले आहे? [मंडळी म्हणते, "आमेन."—सम्पा.] तेथे दुसरा मार्ग नाही. तेथे दुसरा मार्ग नाही, जर तुम्ही ख्रिस्ताबाहेर आहात.

तुम्ही कदाचित *येथे* मागे पाहाल आणि त्याच्यावर विश्वास ठेवाल, म्हणाल, "अवश्य, मी त्याच्यावर विश्वास ठेवीन तो देवाचा पुत्र आहे." चांगले आहे, माझ्या भावा, मी तुझ्याशी हस्तांदोलन करायला तयार आहे जेव्हा तू ते सांगशील. "मी त्याच्यावर विश्वास ठेवीन. मी त्याला माझा तारणारा म्हणून कबूल करीन." ते चांगले आहे, परंतु तू अजूनही त्याच्यामध्ये नाही. "मी प्रचारकाबरोबर हस्तांदोलन करीन. मी माझी पापे कबुल करीन." मी अजूनही त्याच्यामध्ये नाही.

133 आता लक्ष द्या, पाहा पौल काय सांगत आहे, तुम्ही ख्रिस्तामध्ये कसे येता. तुमची सूंता झाली आहे हे कसे ओळखाल? अब्राहाम, त्यांनी एक चिन्ह दिले. आता ह्यांकडे लक्ष द्या, पहिले करिंथकरांस पत्र, 12वा अध्याय, आणि 12व्या वचनापासून सुरुवात करुया.

> *कारण जसे शरीर एक असून त्याला पुष्कळ अवयव असतात, आणि त्या शरीराचे...पुष्कळ अवयव असून सर्व मिळून एक शरीर बनते; तसाच ख्रिस्त आहे.* (विभागलेले नाही. "एक!")

लक्षपूर्वक ऐका. "एक मंडळी द्वारे"? किती जण माझ्यामागे वाचत आहेत? "एका हस्तांदोलनाद्वारे"? "एका पाण्याद्वारे"? नाही. तर मग कोणीतरी चुकीचे आहे.

"एका आत्म्याद्वारे!" ती पहिली लीपी आहे का? तो, "होली स्पिरिट." समजले?

> *...कारण आपण यहुदी असू किंवा हेल्लेणी असू, गुलाम असू किंवा स्वतंत्र असू, एक शरीर होण्यासाठी आपणा सर्वांना एका आत्म्यात बाप्तिस्मा मिळाला आहे. आणि आपण सर्व एकाच आत्म्याने संचरित झालो आहो.*

134 ख्रिस्ताचे शरीर एक आत्मा आहे, जेथे प्रत्येक सदस्य, पेंटेकॉस्टपासून ह्या समयापर्यंत, तोच नवा द्राक्षारस पितात, तोच पवित्र आत्मा, तोच परिणाम पुढे आणतात. आपण ते कसे करतो? "एका आत्म्याद्वारे."

तो देवाचा खुला दरवाजा आहे, पवित्र आत्मा. तो काय आहे? तो देवाचा खुला दरवाजा आहे. तो एक चिन्ह आहे. तो एक शिक्का आहे. तो एक कैवारी. तो एक वकील आहे. तो एक खात्री आहे. तो विसावा आहे. तो शांती आहे. तो चांगुलपणा आहे. तो आरोग्य आहे. तो जीवन आहे. तो—तो देवाचा ह्या सर्व गोष्टींसाठी खुला दरवाजा आहे. तो देवाचा ख्रिस्ताकडे जाण्यासाठी खुला दरवाजा आहे. जो...

देवाने सिध्द केले आहे की त्याने येशूला मेलेल्यांतून उठविले आहे, आणि ते जे ख्रिस्तामध्ये मेलेले आहे देव त्यांना त्याच्याबरोबर पुनरुत्थानाच्यावेळी आणील, "पवित्र आत्म्याला खिन्न करु नका ज्याद्वारे तुम्ही मुक्तीच्या दिवसापर्यंत मुद्रीत केलेले आहात." होय! किती जण ह्यावर विश्वास ठेवतात? [मंडळी म्हणते, "आमेन."—सम्पा.]

135 ख्रिस्त काय आहे? पवित्र आत्मा काय आहे? ते असे काही नाही ज्यावर लोकं हसतात. ते असे काही आहे ज्यावर लोक हसतात; परंतु ते तसे, विश्वासणाऱ्याकरिता नाही.

अविश्वासणाऱ्यासाठी! मला वाटते माझ्याकडे मोठे दोन किंवा तीन आठवडे असते, मला ते उद्या रात्री घ्यायला आवडेल आणि तुम्हाला सांगायला की ते अविश्वासणाऱ्यासाठी काय आहे. मला जरा घाई करु दे, अगदी क्षणामध्ये. तो हास्यास्पद व्यक्ती किंवा गोष्ट आहे. एक सापळा आहे. तो एक अडखळण्याचा धोंडा आहे. तो मृत्यू आहे. ते देवापासून अनंतकाळासाठी वेगळे होणे आहे. मी त्या गोष्टींचा विचार देखील करु शकत नाही. ज्या त्या अविश्वासणाऱ्यासाठी आहे!

136 लक्षात ठेवा, तोच पाऊस ज्याची अविश्वासणाऱ्यानी थट्टा केली, तोच पाऊस होता ज्याद्वारे नोहा व त्याचे कुटूंब वाचले. समजले? तो आत्मा, पवित्र आत्मा ज्याची लोक थट्टा करितात आणि म्हणतात, “वेडे, आणि वेड्यांचा समुह, हा वेडेपणा आहे,” त्या त्याच गोष्टी आहे ज्याद्वारे मंडळी स्वर्गरोहणात जाणार आहे आणि अंतिम दिवसात वर उचलली जाणार आहे; ते बरोबर आहे. तोच पवित्र आत्मा आहे.

137 ते आशीर्वादीत आहेत...मी हे बोलू शकतो, माझ्या अंत:करणाच्या प्रामाणिकपणाने. ते धन्यवादीत आहे जे त्याकरिता भूकेलेले आणि तहानलेले आहेत, कारण ते भरले जातील.

138 उद्या रात्री आपण ह्याविषयी बोलणार आहोत कसा, जेव्हा तो येतो तो काय करतो.

139 आता, येथे किती जण आहेत ज्यांना पवित्र आत्मा स्विकारायला आवडेल, आणि इच्छा आहे की तुमच्याकरिता प्रार्थना करावी, की तुम्हाला तो प्रकाश दिसावा?

तुम्हाला ठाऊक आहे, “तो काय आहे.”

आता, उद्या रात्री, आपण घेणार आहोत, “तो काय करतो.”

140 आणि नंतर पुढच्या रात्री, “तो कसा प्राप्त करावा.” मग आपण बोलविणार आहोत, आपल्याकडे येथे लोक आहेत ज्यांना सुचना दिल्या आहेत, आणि त्यांनी खोल्यामध्ये जावे आणि तेथे राहावे, जर पूर्ण ख्रिसमस ते चालेल, ते बरोबर आहे, पवित्र आत्मा येईपर्यंत. आपण तेथे पोहचणार आहोत, बायबल संस्थेद्वारे. आपण तेथे पोहचणार आहोत आणि तो मिळवणार आहोत जसे देवाने त्याचे अभिवचन दिले आहे, आणि तो सुरुवातीला आला. तोच मार्ग आहे जो करण्याकरिता आपण येथे आहोत. मी...ह्या गोष्टीने काही फरक पडत नाही की कोण काय म्हणते, आपण...

देवाचे वचन...माझ्या अंतःकरणात प्रबल झाले आहे. ते बरोबर आहे. आणि मला ते पाहिजे जे देवाने माझ्यासाठी ठेवले आहे. जर तेथे आणखी काही आहे, स्वर्ग उघड, प्रभू, कारण माझे—माझे अंत:करण त्याकरिता उघडे आहे. ते बरोबर आहे.

141 किती जणांना ते हवे आहे? आता तुमचे हात वर करा, म्हणा, “माझ्याकरिता प्रार्थना करा.” आता, जेव्हा तुमचे हात वर आहेत.

स्वर्गीय पित्या, आम्ही फार वेळापासून शिकवत आहोत. परंतु तुझा आत्मा येथे आहे. तेथे काही हात उंचावलेले आहेत. आणि त्यांना माहीत आहे ते काय आहे, त्यांना माहीत आहे की पवित्र आत्मा म्हणजे काय. मी प्रार्थना करतो, देवा, की ही सभा संपायच्या आधी, की येथे असलेले प्रत्येक हात उंच केले जावोत की त्यांना तो मिळाला आहे. प्रभू, ते प्रदान कर.

142 आम्ही त्यांच्यासाठी प्रार्थना करतो. आम्ही मागतो की त्यांना आशीर्वादीत कर, आणि त्यांना त्यांच्या अंत:करणाची मागणी दे. त्यांच्या हातांकडे पहा, प्रभू ते तुझ्यावर प्रेम करतात. त्यांना तो हवा आहे. त्यांना ठाऊक आहे ते जाऊ शकत नाही...उद्या रात्री, जर तू मला सहाय्य करशील, प्रभू, आम्ही ते वचनातून सिध्द करु शकतो की त्याच्याविना

त्यांचे स्वर्गरोहण कधीच होऊ शकणार नाही. म्हणून मी प्रार्थना करितो, पित्या, की तू त्यांना भूकेलेले आणि तहानलेले कर, ह्यासाठी की ते भरले जातील. मी त्यांना आता तुला सादर करितो, पित्या. आणि हे आशीर्वाद प्रदान कर, आम्ही हे येशूच्या नावाने मागतो. आमेन.

मी त्याच्यावर प्रेम करतो, मी त्याच्यावर प्रेम करतो
कारण त्याने माझ्यावर प्रथम प्रेम केले
आणि माझे तारण विकत घेतले
कलवरीच्या झाडावर.

143 मी हे सांगू इच्छितो हे गाणे पुन्हा गाण्याआधी मी काही सेवकांच्या समुहाला येथे खोलीमध्ये भेटू इच्छितो, शुक्रवारी रात्री, सभा सुरु होण्याआधी, पाहा, शुक्रवारी रात्री. मी...

तुम्हाला समजते मी काय करण्याचा प्रयत्न करीत आहे? हे दाखविण्यासाठी की तो काय आहे, त्याच्याकडे कसे जावे आणि कसला आदर करावा; मग तुम्ही आंधळेपणाने येत नाहीत. काहीतरी ठोकत. तेच कारण आहे मी ते ह्यारात्री कधीच मागितले नाही. माझी इच्छा आहे की तो काय आहे हे तुम्हाला कळावे. ते एक अभिवचन आहे. तो एक शिक्का आहे. तो कैवारी आहे. तो असाच खूप काही.

मग, उद्या रात्री आणि पुढील रात्री, मग आपण तेव्हा सुरुवात करु, मग तेव्हापासून तो येईपर्यंत. काळजी करु नका की त्याला किती वेळ लागेल; आपण तोपर्यंत थांबू. तुमचे अंतःकरण शुध्द करा. तो कधीच एका अशुध्द अंत:करणात ओतणार नाही, नीट व्हा, तयार राहा, आणि तो ते प्रदान करील.

मी त्याच्यावर प्रेम करतो, मी त्याच्यावर प्रेम करतो (आता आपले
हात उभारु या)
कारण त्याने माझ्यावर प्रेम केले
आणि माझे तारण विकत घेतले
कलवरीच्या झाडावर.

पाळक आताच बोलले आहे, आणि आम्ही सहमत आहोत, की उद्या रात्री आपण साडेसात ऐवजी सातला सुरुवात करुया. आणि त्यामुळे मी तुम्हाला साडे–आठ वाजता जाऊ देईन, साडे नऊ ऐवजी. साडे सात...सात वाजता, उद्या रात्री, गाण्याची सभा सुरु होईल. मी संदेशासाठी साडे–सात वाजता येईन.

मी त्याच्यावर प्रेम करतो,

आपण आपले रुमाल काढूया आणि त्याच्यासाठी हलवूया.

मी त्याच्यावर प्रेम करतो

आता औपचारिक कल सोडून देऊया!

कारण त्याने माझ्यावर प्रथम प्रेम केले
आणि माझे तारण विकत घेतले
कलवरीच्या झाडावर.

ठीक आहे, तुमचे पाळक आता, भाऊ नेविल.

***पवित्र आत्मा काय आहे?*** MAR59-1216

(What Is The Holy Ghost?)

***पवित्र आत्मा मालिका***

हा संदेश मूळ रूपाने इंग्रजीत भाऊ विलियम मेरियन ब्रंहम यांनी बुधवार संध्याकाळी, 16 डिसेंबर, 1959 रोजी, अमेरिकेच्या इंडियानाच्या जेफरसनविले येथील ब्रन्हम टेबरनेकल, जेफरसनविले, इंडियाना, यु.एस.ए मधून प्रचार केला होता.

MARATHI

©2020 VGR, ALL RIGHTS RESERVED

VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
044 28274560 • 044 28251791
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org

**<u>छपाईच्या हक्काची सूचना</u>**

संपूर्ण हक्क राखीव आहेत हे पुस्तक घरातील प्रिंन्टरवर स्वतःच्या उपयोगा करिता, किंवा दूस-यांना मोफत देण्या करिता, येशू ख्रिस्ताची सुवार्ता प्रसार करण्या करिता एक साधन म्हणून छापू शकता येईल. हे पुस्तक विकू शकता येणार नाही. किंवा फार मोठया प्रमाणावर प्रती काढण्यास मनाई आहे. किंवा वेबसाईडवर प्रसार करण्यास मनाई आहे. कोणत्याही प्रकारच्या पुर्नःप्राप्ति प्रणाली मधून नक्कल करण्यास मनाई आहे. दूस-या भाषेत भाषांतर करण्यास किंवा रक्कम गोळा करण्यास मनाई आहे. या सर्व गोष्टीं करण्याकरिता Voice Of God Recordings यांची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे.

अधिक माहिती करिता किंवा इतर उपलब्ध गोष्टीं करिता कृपया संपर्क साधा.

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org